दैनिक अहिल्यानगर। पुणे। छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI NO.MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रु. ४.००। अंक २७१ । बुधवार, दि.१५ जुलै २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Sahyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




## महत्वाचे...

### विद्युत कुंपणाच्या धक्क्याने पती-पत्नीचा मृत्यू



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**परभणी :** वन्य प्राण्यांपासून पिकांचे संरक्षण व्हावे म्हणून शेताला विद्युततारेचे कुंपण केले मात्र त्या तारेला स्पर्श झाल्याने शेतकरी पती – पत्नीचाच मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी (दि.१४) पालम तालुक्यातील गुळखंड शिवारात घडली. आशाबी मेहबूब पठाण (वय ३५) तसेच महबूब मदारसाब पठाण(वय ४०) (रा. फरकंडा ता. पालम) अशी मयत पती – पत्नीची नांवे आहेत.

शेतातील ऊसपिकाचे रानडुक्कर आणि इतर प्राण्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी शेतीला केलेल्या विद्युततारांचे कंपनीमध्ये मंगळवारी सकाळपर्यंत हा विद्युतप्रवाह बंद न केल्याने मंगळवारी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास शेतात गेलेल्या आशाबी पठाण यांचा विद्युततारेला स्पर्श झाल्याने त्यांना विजेचा जबर धक्का लागला. पत्नीला विजेचा जोरदार धक्का लागल्याचे पाहताच त्यांचे पती महबूब मदारसाब पठाण यांनी पत्नीला वाचविण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांनाही विद्युत प्रवाहाचा धक्का लागला. या घटनेत पठाण पती – पत्नीचा दुर्दैवी अंत झाला. या प्रकरणी मयत महबूब पठाण यांचे वडील मदारसाब पठाण यांनी पालम पोलिसांत दिलेल्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# चूक यंत्रणेची, शिक्षा शिक्षकांना का?

## टीईटी पेपरफुटीवरून राहुल गांधींचा राज्य सरकारवर हल्लाबोल; फडणवीसांकडे तीन मागण्या

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई : महाराष्ट्र शिक्षक पात्रता (टीईटी) परीक्षा पेपरफुटी प्रकरणावरून राज्यातील राजकारण पुन्हा तापले असून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. चूक यंत्रणेची, मग त्याची शिक्षा प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या उमेदवारांना का? असा थेट सवाल करत त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तीन महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. परीक्षा रद्द होऊन दोन आठवडे उलटूनही नवीन तारीख जाहीर न झाल्याने सुमारे सहा लाख उमेदवारांचे भवितव्य टांगणीला लागल्याचे त्यांनी म्हटले आहे.**



राहुल गांधी यांनी समाजमाध्यमांवर केलेल्या पोस्टमध्ये, टीईटीचा पेपर लीक झाला, परीक्षा रद्द झाली, पण दोषींवर कारवाई करण्याऐवजी प्रामाणिक उमेदवारांनाच मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. वर्षानुवर्षे अभ्यास करणारे, अर्ज भरून शुल्क भरणारे आणि दूरवरच्या परीक्षा केंद्रांवर पोहोचलेले विद्यार्थी आजही अनिश्चिततेत आहेत. हीच मंडळी उद्याचे शिक्षक असून त्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू आहे, अशी टीका केली.

मुख्यमंत्र्यांनी तातडीने टीईटी परीक्षेची नवीन तारीख जाहीर करावी, पेपरफुटीस जबाबदार असलेल्यांवर कठोर कारवाई करावी आणि पेपरफुटीमुळे ज्यांचे एक वर्ष वाया गेले आहे, त्या उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत द्यावी, अशा तीन प्रमुख मागण्या राहुल गांधी यांनी केल्या आहेत.

यंत्रणेची चूक आणि शिक्षा उमेदवाराला, हा न्याय नसल्याचे सांगत त्यांनी १७ जुलै रोजी देहरादून येथे पेपरफुटीच्या वाढत्या घटनांवर सविस्तर भूमिका मांडणार असल्याचेही स्पष्ट केले. दरम्यान, टीईटी पेपरफुटीमुळे आधीच संभ्रमात असलेल्या लाखो उमेदवारांनी राहुल गांधी यांच्या भूमिकेला समाजमाध्यमांवर मोठा पाठिंबा दिला आहे. आता राज्य सरकार नव्या परीक्षेची तारीख कधी जाहीर करणार, दोषींवर कोणती कारवाई होणार आणि उमेदवारांच्या मागण्यांवर काय निर्णय घेणार, याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

### राहुल गांधींनी आधी स्वत:च्या पक्षाकडे पाहावे



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुल गांधी यांच्या टीकेला प्रत्युत्तर देताना, काँग्रेसशासित राज्यांमधील पेपरफुटीच्या घटनांकडे लक्ष वेधले. टीईटी प्रकरणातील दोषींना कोणतीही पाठीशी घातली जाणार नाही, कठोर कारवाई केली जाईल, अशी भूमिका त्यांनी स्पष्ट केली. राहुल गांधींनी महाराष्ट्रावर टीका करण्यापूर्वी त्यांच्या पक्षाची सत्ता असलेल्या राज्यांतील परिस्थितीचाही विचार करावा, असा टोला फडणवीस यांनी लगावला. तसेच उमेदवारांचे नुकसान होणार नाही, यासाठी शासन आवश्यक ती पावले उचलत असल्याचे त्यांनी सांगितले.

## ई-२० पेट्रोलबाबत संभ्रम दूर...

# इथेनॉल मिश्रणामुळे इंजिनला धोका नसल्याचा केंद्राचा दावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** देशभरात लागू करण्यात आलेल्या ई-२० (२० टक्के इथेनॉल मिश्रित) पेट्रोलबाबत निर्माण झालेल्या शंका आणि अफवांना उत्तर देत केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाने सविस्तर स्पष्टीकरण जारी केले आहे. ई-२० इंधनामुळे जुन्या वाहनांच्या इंजिनला किंवा रबरच्या भागांना कोणतीही हानी होत नसल्याचा दावा मंत्रालयाने केला आहे. इथेनॉल मिश्रणाचा कार्यक्रम हा घाईघाईने राबविण्यात आलेला नसून दोन दशकांहून अधिक काळ नियोजनबद्ध पद्धतीने विकसित करण्यात आल्याचेही मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.

मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतात २००१ मध्ये इथेनॉल मिश्रणाचा पायलट प्रकल्प सुरू झाला असून २०२५-२६ या इथेनॉल पुरवठा वर्षात २० टक्के मिश्रणाचे उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. मारुती सुझुकीने २०२५-२६ मध्ये सुमारे २.८४ कोटी वाहनांची तपासणी केली असता ई-२० इंधनामुळे इंजिन किंवा इंधन प्रणालीचे कोणतेही नुकसान आढळले नसल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच या योजनेमुळे आतापर्यंत सुमारे १.९७ लाख कोटी रुपयांचे परकीय चलन वाचले, ३१६ लाख मेट्रिक टन कच्च्या तेलाच्या आयातीची बचत झाली आणि शेतकऱ्यांना १.६६ लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कम मिळाल्याचे मंत्रालयाने नमूद केले आहे. नागरिकांनी सोशल मीडियावरील अपप्रचारावर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीलाच प्राधान्य द्यावे, असे आवाहनही मंत्रालयाने केले आहे.

# बेगच्या फ्लॅटवर छापा; पिस्तूल, काडतुसे जप्त!

## सोनू बेगसह आणखी तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहरात अवैध शस्त्रास्त्रांविरुद्ध पोलिस व शीघ्र कृती दलाच्या पथकाने मोठी कारवाई केली असून, श्रीरामपूरातील सरस्वती कॉलनीतील एका अपार्टमेंटमध्ये धाड टाकून पोलिसांनी १ देशी बनावटीचे पिस्टल आणि २ जिवंत काडतुसे जप्त केली.याप्रकरणी संघटित गुन्हेगारी टोळी चालवणाऱ्या सोनू बेग यांच्यासह एकूण तीन आरोपीविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात आर्म क्ट अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. सोनू बेग पूर्वीच्या एका गुन्ह्यात अटकेत आहे. दरम्यान, श्रीराम सेवा संघाचे प्रमुख आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचे नेते सागर बेग यांच्या निवासस्थानावरही पोलिसांनी छापेमारी केली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार (दि. १३) जुलै रोजी श्रीरामपूरचे अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाल्याने हनुमान मंदिरामागे, सरस्वती कॉलनी (वॉर्ड नं. ७) येथील एका विना रंगाच्या इमारतीच्या माळ्यावर काही गुंडांनी अवैध अग्निशस्त्राचा धाक दाखवून दोन मुलींना डांबून ठेवले आहे. अशी माहिती मिळाली होती. याबाबत माहितीचे गांभीर्य ओळखून अप्पर पोलीस अधीक्षकांनी तात्काळ श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब हंडाळ यांना ताफ्यासह घटनास्थळी रवाना होण्याचे आदेश दिले. पो.स.ई. हंडाळ यांनी श्रीरामपूर पोलीस कर्मचारी आणि शीघ्र कृती दलाच्या ( उर्वरीत पान ४ वर)

### शस्त्र आणले कुठून?

**हे अवैध अग्निशस्त्र आरोपींनी कोणाकडून आणले होते? ते कोणाला विक्री करणार होते? आणि त्यांचा मुख्य उद्देश काय होता? याबाबत श्रीरामपूर पोलीस अधिक तपास करत आहेत.**

### खोलीत सापडल्या गर्भनिरोधक गोळ्या?

**मुलींचे फोटो, गर्भनिरोधक, गोळ्या व अन्य आपत्तीजनक गोष्टी बंद खोलीत सापडल्या असून मुलींचे उपचाराचे काही कागदपत्रे सापडल्याचे बोलले जात आहे. मात्र फोटो, फाईल्स, सापडलेले नाहीत. ही चर्चा खोटी चुकीची आणि निराधार असल्याचे पोलीस सुत्रांकडून समजले.**



## हत्या प्रकरणाशी माझा संबंध सिद्ध करा

# सागर बेग यांचे आ. ओगले यांना आव्हान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर :** आकाश दुबैय्या हत्या प्रकरणानंतर शहरात सुरू झालेल्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांना मंगळवारी आणखी धार आली. राष्ट्रीय श्रीराम संघाचे अध्यक्ष तथा शिवसेना (शिंदे)चे नेते सागर बेग यांनी पत्रकार परिषद घेत हत्या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचा ठाम दावा केला. या प्रकरणाशी आपला संबंध असल्याचे कोणी सिद्ध केले, तर स्वतः वर गुन्हा दाखल करावा, असे खुले आव्हान त्यांनी दिले. तसेच विनाकारण बदनामी करणाऱ्यांविरोधात मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशाराही त्यांनी दिला.

बेग म्हणाले, आकाश दुबैय्या हत्या प्रकरणातील घटनेनंतर सर्वप्रथम हॉटेल व्यावसायिक शेखर दुबैय्या यांचाच आपल्याला फोन आला होता. हॉटेलमध्ये काही व्यक्तींकडून मारहाण सुरू असल्याची माहिती मिळताच आपण तातडीने पोलिस उपअधीक्षकांशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. दुबैय्या कुटुंबावर आपले नाव घेण्यासाठी दबाव टाकला जात असल्याचाही त्यांनी आरोप केला.

आमदार हेमंत ओगले यांच्या वक्तव्यावर टीका करताना, या प्रकरणामागे एखादा 'आका' असल्याचे सांगितले जाते, तर त्याचे नाव जाहीर का केले जात नाही? केवळ संशयाचे वातावरण निर्माण करून राजकीय लाभ घेण्याचा प्रयत्न सुरू आहे, असा आरोप त्यांनी केला.

शहर बंद आंदोलनात सहभागी न होण्याबाबत स्पष्टीकरण देताना, त्या दिवशी आपण शहराबाहेर असल्यामुळे उपस्थित राहू शकलो नाही, अन्यथा आंदोलनात निश्चित सहभागी झालो असतो, असे त्यांनी सांगितले.

सरस्वती कॉलनीतील सोनू बेग यांच्या घरावर झालेल्या पोलिस झडतीवरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सरकारी पंचांशिवाय कारवाई झाली आणि संपूर्ण कारवाईचे चित्रीकरण करण्यात आले नसल्याचा दावा करत, या कारवाईमागे काही प्रभावशाली राजकीय व्यक्तींचा हात असल्याचा आरोप त्यांनी केला.

राजकारणातील वाढत्या जनाधारामुळे आपल्याला लक्ष्य केले जात असल्याचा दावा करत, माध्यमांनीही शहानिशा करूनच बातम्या प्रसिद्ध कराव्यात, असे आवाहन सागर बेग यांनी पत्रकार परिषदेत केले.

## भिंगारमध्ये जुगार अड्ड्यावर छापा

# पावणे दोन लाखाच्या मुद्देमालासह ७ आरोपी ताब्यात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सारसनगर रस्त्यावरील हॉटेल आरवीच्या शेजारी असलेल्या एका बांधकामाच्या आडोशाला बेकायदेशीरपणे चालणाऱ्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी १ लाख ६७ हजार ५०० रुपयांच्या रोख रकमेसह जुगाराचे साहित्य व वाहने जप्त केली असून, एकूण ७ आरोपींना रंगेहात ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस कर्मचारी योगेश जबाजी कर्डीले यांनी या प्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिस सूत्रांकडून समजलेली सविस्तर माहिती अशी की, सोलापूर रस्त्यावरील कोंबडीवाला मळा परिसरात काही इसम पैशांवर हार-जितीचा तिरट नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने १३ जुलै रोजी सायंकाळी पावणेसात वाजेच्या सुमारास घटनास्थळाची वेढाबंदी करून अचानक छापा टाकला. ( उर्वरीत पान ४ वर)

### ऑपरेशन टायगर'वर ठाकरे सेनेचा कायदेशीर पलटवार!

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील सहा खासदारांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीनीकरणाचा दावा केल्यानंतर महाराष्ट्रातील राजकारणात नवा घटनात्मक संघर्ष सुरू झाला आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) संसदीय पक्षाचे नेते अरविंद सावंत यांनी १३ जुलै २०२६ रोजी मुंबई ईशान्य मतदारसंघाचे खासदार संजय दिना पाटील यांच्यासह बंडखोर खासदारांना औपचारिक पत्र पाठवत त्यांच्या विलीनीकरणाच्या दाव्यावर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या पत्रातून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेने स्पष्ट भूमिका मांडत, केवळ काही खासदारांनी ( उर्वरीत पान ४ वर)

## कर्जमाफीच्या बदलाला मंत्रिमंडळाची मंजुरी

# मंत्रिमंडळाचे आठ निर्णय : कृषी बाजार, एसटी बसस्थानके, नागरी विकासाला चालना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शेतकरी, नागरी विकास, पायाभूत सुविधा, क्रीडा, परिवहन आणि स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी महत्त्वाचे ठरणारे आठ निर्णय घेण्यात आले. विशेषतः शेतकऱ्यांसाठी पीक कर्जाशी संबंधित मोठा दिलासा देण्यात आला असून, कर्जमाफीच्या निकषांमध्ये बदल करून लाखो शेतकऱ्यांना लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या निर्णयांचा परिणाम अहिल्यानगरसह राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागावर होणार आहे.

सर्वाधिक महत्त्वाचा निर्णय म्हणजे 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' मधील निकषांमध्ये सुधारणा. २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांची मर्यादा रद्द करण्यात आली आहे. तसेच २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अटही हटविण्यात आल्याने सुमारे २३ लाख शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ मिळणार असून, हा निर्णय अहिल्यानगर जिल्ह्यातील हजारो शेतकऱ्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे.

याशिवाय पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे ५५८.४३ हेक्टर जागेवर आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार उभारण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या प्रकल्पामुळे कृषी उत्पादनांच्या विपणनाला चालना मिळणार असून भविष्यात राज्यातील शेतकऱ्यांसाठी आधुनिक बाजारपेठेचे नवे दालन खुले होणार आहे.राज्यातील महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींच्या मालमत्तांचे मुद्रीकरण धोरण मंजूर करण्यात आले असून, स्थानिक स्वराज्य संस्थांना नवीन उत्पन्नाचे स्रोत उपलब्ध होणार आहेत. तसेच केंद्र शासनाच्या अर्बन चॅलेंज फंड अभियानाची अंमलबजावणी (उर्वरीत पान ४ वर)

# बोल्हेगावात तरुणाचे अपहरण निर्जनस्थळी नग्न करून बेदम मारहाण

## चौघाजणांसह साथीदारांवर गुन्हा दाखल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** फिर्यादीच्या भावाने एका महिलेला विनाकारण शिवीगाळ करून केलेल्या भांडणाचा रागातून एका तरुणाचे अपहरण करून त्याला निर्जनस्थळी नेऊन नग्न करून लाकडी दांडके व बेल्टने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना बोल्हेगाव परिसरात घडली आहे. या प्रकाराने परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. घाबरलेला तरुण व त्याचे नातेवाईक फिर्याद देण्यासाठी पुढे येत नसल्याने शेवटी तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस हेड कॉन्स्टेबल अब्दुलकादर परवेज इनामदार यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली आहे. या प्रकरणी तोफखाना पोलिसांनी चार जणांसह त्यांच्या इतर साथीदारांवर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, पीडित तरुण फैजान समीर सय्यद (रा. गोविंदपुरा) हा २४ जून रोजी दुपारी बोल्हेगाव चौक येथे रिक्षाचे भाडे घेऊन गेला होता. तेथे आरोपी अमीर शेख आणि अमानत अन्सारी यांनी त्याला आवाज देऊन बोलावले. त्यानंतर त्याला बळजबरीने



मोपेड मोटारसायकलवर बसवून बोल्हेगाव येथील एका शेतात घेऊन गेले. त्या ठिकाणी अमानत अन्सारी याने त्याचे मित्र ( उर्वरीत पान ४ वर)

# बांधकाम कामगारांसाठी नवी योजना लागू

## मृत्यू सहाय्य, निवृत्तीवेतन व शिक्षण अनुदानात भरीव वाढ

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** राज्यातील नोंदणीकृत बांधकाम कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी राज्य शासनाने मोठा दिलासादायक निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या चार प्रमुख कल्याणकारी योजनांमध्ये सामाजिक सुरक्षा संहिता-२०२० नुसार व्यापक सुधारणा करण्यात आल्या असून मृत्यू सहाय्य, निवृत्तीवेतन, शैक्षणिक अर्थसहाय्य आणि प्रसूती सहाय्याच्या रकमेत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. या सुधारणांमुळे राज्यातील लाखो बांधकाम कामगारांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेला बळ



मिळणार असल्याची माहिती कामगार मंत्री ड. आकाश फुंडकर यांनी दिली. सुधारित योजनांनुसार नोंदणीकृत बांधकाम कामगाराच्या नैसर्गिक मृत्यूनंतर कुटुंबाला ३.५० लाख रुपये, तर अपघाती मृत्यू झाल्यास तब्बल ६.५० लाख रुपयांचे एकरकमी सहाय्य मिळणार आहे. कायमस्वरूपी दिव्यांगत्व आल्यास दोन लाख रुपयांची मदत दिली जाईल.निवृत्तीवेतन योजनेतही महत्त्वाचे बदल करण्यात आले असून वयाची ६० वर्षे पूर्ण आणि किमान १० वर्षे नोंदणी असलेल्या कामगारांना नोंदणीच्या कालावधीनुसार वार्षिक ६ हजार, ९ हजार किंवा १२ हजार रुपयांचे निवृत्तीवेतन थेट बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे.कामगारांच्या मुलांच्या शिक्षणासाठीही भरीव आर्थिक सहाय्य जाहीर करण्यात आले आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी एक लाख रुपये, अभियांत्रिकी ( उर्वरीत पान ४ वर)

### महत्त्वाच्या सुधारित तरतुदी

- नैसर्गिक मृत्यू सहाय्य : ३.५० लाख
- अपघाती मृत्यू सहाय्य : ६.५० लाख
- कायमस्वरूपी दिव्यांग सहाय्य : २ लाख
- निवृत्तीवेतन : वार्षिक ६,००० ते १२,०००
- इयत्ता ९ वी उत्तीर्ण पाल्य : २०,०००
- इयत्ता ११ वी उत्तीर्ण पाल्य : २५,०००
- वैद्यकीय पदवी शिक्षण : १ लाख
- अभियांत्रिकी पदवी शिक्षण : ६० हजार
- परदेशी उच्च शिक्षण : संपूर्ण अभ्यासक्रम शुल्क शासनाकडून
- महिला कामगार प्रसूती सहाय्य : २५ हजार (पहिल्या दोन अपत्यांसाठी)
- इयत्ता १ ते ८ वीच्या दोन पाल्यांना : मोफत शैक्षणिक साहित्य संच

# महागाईचे दुष्टचक्र आणि ढासळणारे कौटुंबिक अर्थशास्त्र




देशाची अर्थव्यवस्था वेगाने वाढत असल्याचे दावे सातत्याने केले जात आहेत. जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था होण्याची स्वप्ने रंगवली जात आहेत. शेअर बाजार नवनवे उच्चांक गाठतो, अब्जाधीशांच्या संपत्तीत विक्रमी वाढ होते, जीडीपीच्या आकडेवारीवर टाळ्या वाजतात; पण या चमकदार चित्राच्या दुसऱ्या बाजूला उभा असलेला सामान्य माणूस मात्र दिवसेंदिवस आर्थिक विवंचनेत सापडत आहे. कारण, त्याच्या घरातील उत्पन्नाच्या तुलनेत खर्चाचा आलेख अधिक वेगाने वाढत आहे. महागाई आणि कर्ज या दोन चक्रव्यूहात भारतीय कुटुंबे अडकत चालली आहेत.

जून महिन्यात किरकोळ महागाईचा दर ४.३८ टक्क्यांवर पोहोचला. तब्बल १७ महिन्यांनंतर महागाईने रिझर्व्ह बँकेने निश्चित केलेली ४ टक्क्यांची नियंत्रणरेषा ओलांडली आहे. ही केवळ सांख्यिकीय वाढ नाही; तर प्रत्येक घराच्या स्वयंपाकघरात, बाजारात आणि मासिक बजेटमध्ये जाणवणारा आर्थिक धक्का आहे. अन्नधान्य, भाजीपाला, खाद्यतेल, दूध, गॅस, वीज, शिक्षण, आरोग्य आणि वाहतूक या सर्वच खर्चामध्ये सातत्याने वाढ होत आहे. परिणामी, सामान्य माणसाचे कौटुंबिक अर्थशास्त्र अक्षरशः कोलमडत आहे.

गेल्या दशकात भारतात दरडोई उत्पन्नात अपेक्षित वाढ झालेली नाही. उलट महागाईचा वेग अनेक कुटुंबांच्या उत्पन्नवाढीपेक्षा जास्त राहिला आहे. वेतनवाढ मर्यादित, रोजगाराची अनिश्चितता कायम आणि दुसरीकडे जीवनावश्यक वस्तूंच्या किमती सातत्याने वाढत असल्याने बचत हा शब्दच अनेकांच्या आयुष्यातून हद्दपार होत आहे. पूर्वी महिन्याच्या उत्पन्नातून काही रक्कम बाजूला ठेवणारे मध्यमवर्गीय आज महिनाअखेर कर्ज काढण्याच्या अवस्थेत पोहोचले आहेत.

भारतीय कुटुंबव्यवस्थेची ताकद ही बचतीमध्ये होती. पोस्ट, बँका, सोनं किंवा शेतीमध्ये गुंतवणूक करून भविष्यासाठी तरतूद करण्याची परंपरा होती. आज परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. घर, वाहन, शिक्षण, आरोग्य, मोबाईल, इलेक्ट्रॉनिक वस्तूंपासून अगदी दैनंदिन खर्चासाठीही कर्ज घेण्याची वेळ येत आहे. क्रेडिट कार्ड, वैयक्तिक कर्ज, 'बाय नाऊ-पे लेटर' यांसारख्या योजनांनी तात्पुरता दिलासा दिला असला, तरी त्या भविष्यातील उत्पन्नावर आधीच ताबा मिळवत आहेत. परिणामी, देशात दरडोई कर्जाचा आलेखही झपाट्याने वाढत आहे.

महागाईचा सर्वाधिक फटका ग्रामीण आणि निम्न मध्यमवर्गाला बसत आहे. शेतमालाला उत्पादनखर्चाच्या तुलनेत पुरेसा भाव मिळत नाही, तर ग्राहकांना त्याच वस्तू महाग दराने विकत घ्याव्या लागतात. या साखळीत सर्वाधिक फायदा मध्यस्थांना होतो आणि उत्पादक व ग्राहक दोघेही आर्थिकदृष्ट्या कमकुवत होतात. ही विसंगती देशाच्या अर्थव्यवस्थेसाठी धोकादायक आहे.

महागाई वाढली की रिझर्व्ह बँकेसमोर व्याजदर वाढविण्याचा पर्याय उभा राहतो. व्याजदर वाढले की गृहकर्ज, वाहनकर्ज, शैक्षणिक कर्ज आणि उद्योगांसाठी घेतलेल्या कर्जांचे हप्ते वाढतात. म्हणजेच महागाई रोखण्यासाठी घेतलेला निर्णयही सामान्य नागरिकांच्या खिशावर अतिरिक्त भार टाकतो. एकीकडे महागाई आणि दुसरीकडे वाढते ईएमआय हे दुहेरी संकट निर्माण होते.

आज भारतातील लाखो तरुण रोजगाराच्या शोधात आहेत. ज्यांना रोजगार आहे, त्यांच्यापैकी अनेकांचे वेतन महागाईच्या वेगाशी स्पर्धा करू शकत नाही. कर, विमा, शिक्षण शुल्क, आरोग्य खर्च आणि घरभाडे यामध्ये झालेली वाढ पाहता प्रत्यक्षात उपलब्ध राहणारे उत्पन्न सातत्याने कमी होत आहे. त्यामुळे कुटुंबाचा आर्थिक समतोल बिघडणे स्वाभाविक आहे.

सरकारने महागाईवर नियंत्रण ठेवण्यासाठी इंधन, अन्नधान्य पुरवठा, साठेबाजीविरोधी कारवाई आणि रोजगारनिर्मिती यावर अधिक प्रभावी उपाययोजना करण्याची गरज आहे. केवळ आकडेवारीत अर्थव्यवस्था मजबूत असल्याचे सांगून सामान्य माणसाच्या रिकाम्या खिशाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. आर्थिक विकासाचा लाभ जर शेवटच्या घटकापर्यंत पोहोचत नसेल, तर तो विकास अपुरा ठरतो.

आज सर्वसामान्य भारतीयाची सर्वात मोठी चिंता शेअर बाजारातील निर्देशांक नाही, तर घरातील किराणा, मुलांच्या शिक्षणाची फी, रुग्णालयाचा खर्च आणि महिनाअखेरीस भरायचा ईएमआय आहे. अर्थव्यवस्थेचे खरे यश हे जीडीपीच्या आकड्यांनी नव्हे, तर सामान्य नागरिकाच्या जीवनमानाने मोजले जाते. जेव्हा कुटुंबाला सन्मानाने जगण्यासाठी कर्जाचा आधार घ्यावा लागतो, तेव्हा अर्थव्यवस्थेतील काहीतरी मूलभूत बिघाड झाल्याचे मान्य करावे लागते.

महागाईचे हे दुष्टचक्र वेळेत थांबवले नाही, तर त्याचे परिणाम केवळ आर्थिक राहणार नाहीत; ते सामाजिक आणि मानसिक स्तरावरही गंभीर असतील. बचत कमी होईल, कर्जबाजारीपणा वाढेल, उपभोग क्षमता घटेल आणि आर्थिक विषमता अधिक तीव्र होईल. म्हणूनच आजची गरज केवळ महागाईचे आकडे जाहीर करण्याची नाही, तर सामान्य माणसाच्या ढासळलेल्या कौटुंबिक अर्थशास्त्राला पुन्हा उभारी देणारी ठोस आर्थिक धोरणे राबविण्याची आहे. कारण मजबूत अर्थव्यवस्थेचा पाया हा मोठ्या उद्योगांमध्ये नसतो; तो प्रत्येक भारतीय कुटुंबाच्या स्वयंपाकघरात, बचत खात्यात आणि आर्थिक सुरक्षिततेत असतो. त्याच पायाला आज सर्वाधिक तडे जात असल्याची वस्तुस्थिती नाकारून चालणार नाही.

# दिशा समितीच्या बैठकीत आ. विवेक कोल्हे यांनी मांडले कोपरगावच्या विकासाचे प्रश्न

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**कोपरगाव :** अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) बैठकीत कोपरगाव मतदारसंघाच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या प्रश्नांवर आमदार विवेक कोल्हे यांनी प्रभावीपणे लक्ष वेधत ठोस मागण्या मांडल्या. समितीचे अध्यक्ष खासदार भाऊसाहेब वाकचौरे, सहअध्यक्ष खा. निलेश लंके, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे, तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी व दिशा समितीचे सदस्य उपस्थित होते. बैठकीत आ. विवेक कोल्हे यांनी कोपरगाव मतदारसंघातील नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित प्रश्नांना प्राधान्य देत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला.

महावितरणच्या समस्यांवर चर्चा करताना तालुक्यातील सर्व घरगुती वीज जोडण्या गावठाण फीडरवर जोडण्यासाठी आवश्यक सविस्तर प्रकल्प अहवाल (ॾझठ) एका महिन्याच्या आत तयार करण्यात येईल, अशी ग्वाही महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांनी दिली.

जल जीवन मिशनअंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजनांमधील अडथळे तातडीने दूर करून प्रलंबित कामांना गती देण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले. तसेच केंद्र शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी कांदा चाळ, शेततळे अस्तरीकरण, यांत्रिकीकरण आदी योजनांतील लाभार्थ्यांची संख्या वाढविण्यासाठी प्रभावी नियोजन करण्याची मागणी आ. कोल्हे यांनी केली.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (झचएत्रझ) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या कर्ज प्रस्तावांना बँकांकडून होणारा विलंब गंभीर असल्याचे निदर्शनास आणून देत, पात्र युवक व नवउद्योजकांना वेळेत कर्ज मंजूर करण्यासाठी संबंधित बँकांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

याशिवाय प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (झचत्रड्ढध) टप्पा-४ अंतर्गत कोपरगाव तालुक्यातील पात्र रस्त्यांचा समावेश करून ग्रामीण भागातील दळणवळण अधिक सक्षम करण्याची मागणी करण्यात आली. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास कार्यक्रमात कोपरगाव तालुक्याचा समावेश करण्याचीही मागणी आ. कोल्हे यांनी केली. भूजल पातळी वाढविणे, जलसंधारणाला चालना देणे, शेतीसाठी शाश्वत पाणी उपलब्ध करणे आणि संभाव्य दुष्काळी परिस्थितीचा प्रभाव कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

रकोपरगावच्या विकासाशी संबंधित प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करून केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा जास्तीत जास्त लाभ मतदारसंघातील नागरिक आणि शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचे आ. विवेक कोल्हे यांनी यावेळी स्पष्ट केले.

# ज्ञानबा-तुकाराम जयघोषात मांडव्य ऋषी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**साकुर :** पारनेर तालुक्यातील मांडवे खुर्द येथून 'श्री क्षेत्र मांडव्य ऋषी पायी दिंडी सोहळ्याचे' पंढरपूरकडे मोठ्या उत्साहात प्रस्थान झाले. संत माणिक गिरी महाराज व धनाजी बाबा गागरे यांच्या कृपाशीर्वादाने निघालेल्या या दिंडीचे यंदा १९ वे वर्ष आहे. दिल बादशहा बाबा गडावरून प्रस्थान झाल्यानंतर, रविवारी सकाळी विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात आरती व कलश पूजन करण्यात आले. टाळ-मृदुंगाचा गजर आणि 'ज्ञानबा-तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. शेकडो वारकरी भगव्या पताका खांद्यावर घेऊन विठ्ठल नामाच्या ठेक्यावर नाचत मार्गस्थ झाले. ह.भ.प. प्रभू महाराज पिटाले, नंदकुमार महाराज सोनवणे, भीमराज महाराज उगलमुगले आणि गागरे परिवाराच्या मार्गदर्शनाखाली व व्यवस्थापनाखाली या सोहळ्याचे नेटके आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यामुळे गावात भक्तीमय आणि धार्मिक एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले होते.

# टाकळीभान येथे युरिया खताची टंचाई

## कृषी विभागाने लक्ष देण्याची गरज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथे शेतकऱ्यांना युरिया खताची टंचाई भासत असून खत विक्रेते युरिया नसल्याचे सांगत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची मोठी अडचण झाली असून श्रीरामपूर तालुका कृषी विभागाने कृषी केंद्रांवर खतांची माहिती घेऊन शेतकऱ्यांचे युरिया खताबाबतचे प्रश्न सोडवावे अशी मागणी टाकळीभान व परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात येत आहे. मध्यंतरी पाऊस चांगला झाला असल्याने पिके जोमात आहेत. परंतु त्यांना इतर खतांबरोबरच युरिया खताची गरज असून ते मिळत नसल्याने शेतकऱ्यांची मोठी पंचायत झाली आहे. खत विक्रेते युरिया खतांची साठेबाजी करून काही जवळच्या लोकांना तसेच बाहेर जास्त भावाने युरिया खते देतात का असा संशय निर्माण झाला असल्याने कृषी केंद्रावर देखरेख ठेवणाऱ्या तालुका कृषी विभागाने याची चाचपणी करणे गरजेचे असल्याचे मत शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तरी शेतकऱ्यांचा युरिया खताबाबतचा प्रश्न कृषी विभागामार्फत सोडविण्यात यावा अशी मागणी टाकळीभान व परिसरातील शेतकऱ्यांच्या वतीने करण्यात आली आहे.

# श्रीरामपूर नगरपरिषदेकडून मालमत्ता हरकतींसाठी २० जुलैपर्यंत मुदतवाढ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**श्रीरामपूर :** श्रीरामपूर नगरपरिषद हद्दीतील करपात्र मालमत्तांच्या करनिर्धारण याद्यांबाबत हरकती व आक्षेप नोंदविण्यासाठी मालमत्ताधारकांना २० जुलै २०२६ पर्यंत अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. श्रीरामपूर बंदच्या पार्श्वभूमीवर नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती नगराध्यक्ष करण ससाणे, उपाध्यक्षा कांचन सानप आणि मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी दिली.

नगरपरिषदेकडून सन २०२६-२७ ते २०२९-३० या चार वर्षांच्या कालावधीसाठी नगरपरिषद क्षेत्रातील इमारती व भूखंडांच्या करनिर्धारणाच्या प्रारूप याद्या वसुली वॉर्डनिहाय तयार करण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ११८ नुसार या प्रारूप करमूल्यांकन याद्यांचे प्रकाशन ८ जून ते ७ जुलै २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. तसेच संबंधित मालमत्ताधारकांना कलम ११९ अन्वये स्वतंत्र नोटिसाही बजावण्यात आल्या आहेत.

यादीतील नोंदींबाबत हरकती व आक्षेप नोंदविण्यासाठी सुरुवातीला ७ जुलैपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर ती १५ जुलैपर्यंत वाढविण्यात आली. मात्र, अलीकडील श्रीरामपूर बंदमुळे अनेक नागरिकांना हरकती दाखल करता आल्या नसल्याने आता अंतिम मुदत २० जुलै २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

नगरपरिषद प्रशासनाने सर्व करपात्र मालमत्ताधारकांनी मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह हरकती व आक्षेप नगरपरिषद कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन केले आहे.

# खडका फाटा येथे विहिरीत बुडून शेतकरी लक्ष्मण भांगे यांचा मृत्यू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा :** तालुक्यातील खडका फाटा परिसरातील हॉटेल मंगलदीप व हॉटेल स्वादजवळ असलेल्या विहीर टोल नाक्या जवळ विहिरीत बुडाल्याने ६५ वर्षीय शेतकरी लक्ष्मण दत्तात्रय भांगे यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. मिळालेल्या माहितीनुसार लक्ष्मण भांगे हे मंगलदीप हॉटेल स्वादचे चालक अमोल भांगे व विष्णू भांगे यांचे वडील आहे, खडका फाटा परिसरात असताना पाय घसरून विहिरीत पडल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली. संबंधित पोलीस आणि महसूल प्रशासनाने घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. मृत्यूचे नेमके कारण आणि घटनेमागील परिस्थितीचा तपास सुरू आहे.या आकस्मित घटनेमुळे भांगे कुटुंबीयांवर आघात झाला असून खडका फाटा परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. लक्ष्मण भांगे हे उच्च शिक्षित शेतकरी होते.

# प्रणव धुमाळ याचा शाळेच्या वतीने सन्मान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**चांदा :** नेवासा तालुक्यातील चांदा येथील जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये शिक्षण घेणारा विद्यालयातील विद्यार्थी प्रणव विठ्ठल धुमाळ याने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये यशस्वी भरारी घेतल्यामुळे विद्यालयाच्या वतीने त्याचा नुकताच शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. प्रणवला शिक्षक दीपक निमसे, बबन घोडे, संदीप कासार जालिंदर शेटे या शिक्षकांचे त्याला विशेष मार्गदर्शन लाभले म्हणूनच प्रणव धुमाळ याने शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत यश संपादन केले.

प्रणव याच्या सन्मान सोहळ्याच्या वेळेस शाळेचे प्राचार्य अंशुमन वाकचौरे, उपप्राचार्य रघुनाथ भोजने, पर्यवेक्षक राजेश शेंडगे, भाऊसाहेब तांबे, अमोल दहातोंडे,भगवान भाबड,अनंत शेळके, एस. एस. मरडे,आर. डी. सोनवणे,वाय एस.गायकवाड यांच्या सह आदी शिक्षक शिक्षिका विद्यार्थी पालक उपस्थित होते.




# छत्री, हरिपाठ व मिष्टान्न वाटपातून वारकऱ्यांची सेवा

## राहुरीत मराठी पत्रकार संघटनेचा सेवाभावी उपक्रम

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी,** आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे प्रस्थान केलेल्या श्री क्षेत्र रामेश्वर अधिष्ठित पंचक्रोशी वारकरी पायी दिंडीतील वारकऱ्यांची राहुरी फॅक्टरी परिसरात महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेच्या वतीने छत्री, हरिपाठ व मिष्टान्न वाटप करून स्वागत करण्यात आले. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर वारकऱ्यांना छत्रींचे वाटप केल्याने या सेवाभावी उपक्रमाचे वारकऱ्यांनी स्वागत केले. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे, जिल्हाध्यक्ष तथा स्वराज्य फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अनिल कोळसे आणि मनोज साळवे यांच्या हस्ते या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महिला ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संचालिका परिघा आरोटे, सोनेरी विश्वास आरोटे, छत्रपती विश्वास आरोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. संगमनेर विधानसभा मतदारसंघाचे जिल्हा परिषद सदस्य इंजि. रामहरी कातोरे यांनी या उपक्रमाचे कौतुक करत, पावसाळ्यात वारकऱ्यांच्या संरक्षणासाठी छत्री वाटप करणे ही समाजोपयोगी सेवा असल्याचे सांगितले. पत्रकार समाजातील प्रत्येक घटकाच्या सुख-दुःखात सहभागी होत सामाजिक बांधिलकी जपत असल्याचे त्यांनी नमूद केले. श्री क्षेत्र रामेश्वर (धांदरफळ बु., ता. संगमनेर) येथून निघालेल्या या दिंडीचे यंदाचे २३ वे वर्ष असून श्री संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखी सोहळ्यासमवेत दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली आहे. दिंडी प्रस्थानापूर्वी माजी सभापती अनिलराव प्रतापराव देशमुख यांच्या हस्ते श्री भगवान रामेश्वरांचा अभिषेक करण्यात आला. ह.भ.प. सुदाम महाराज कोकणे यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी भक्तिमय वातावरणात पुढे सरकत आहे. यावेळी अ‍ॅड. माधवराव कानवडे, संपतराव विष्णू डोंगरे, पांडुशेठ दामोदर घुले, रोहिदास डेरे आदी मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात डॉ. विश्वासराव आरोटे, परिघा आरोटे व अनिल कोळसे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सेवाभावी उपक्रमाबद्दल वारकऱ्यांनी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघटनेचे आभार मानत पदाधिकाऱ्यांचा सन्मान केला.

# माणुसकीचा गौरव करण्याची संस्कृती वाढली पाहिजे : प्राचार्य शेळके

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिरसगाव :** माणूसच माणसाचा तारणहर असतो, तोच संस्कृती आणि गती निर्माण करतो, त्यामुळे माणूसच माणसाचा तारणहार ठरतो, दिशादर्शक आणि शिल्पकार ठरतो, अशा ऋण भावनेतून माणुसकीचा गौरव करण्याची संस्कृती वाढली पाहिजे, असे विचार विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष माजी प्राचार्य टी.ई. शेळके यांनी व्यक्त केले.

येथील विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानतर्फे डॉ. बाबुराव उपाध्ये व प्रा. डॉ. नेहा पाटील यांनी संपादित केलेल्या माजी प्राचार्य सौ. मंगल श्रीधर पाटील यांच्यावरील 'अमृतमंथन' गौरवग्रंथ परिसंवाद प्रसंगी प्राचार्य शेळके बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य शंकरराव अनारसे होते. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी 'अमृतमंथन' ग्रंथाचा सविस्तर परिचय करून दिला. यावेळी प्रतिष्ठानचे संस्थापक, सचिव सुखदेव सुकळे यांनी स्वागत करून पाहुण्यांचे सत्कार केले. डॉ. राजीव शिंदे, हभप कृष्णानंद महाराज, माजी प्राचार्य डॉ. शंकरराव गागरे. माजी प्राचार्य सुभाष लिंगायत, माजी नायब तहसिलदार दत्तात्रय रायपल्ली,प्रा. एकनाथ औटी, प्रा. रुबेन गायकवाड, कृष्णा महाराज शेजुळ, सुरेखा बुरकुले, वैष्णवी बुरकुले आदी उपस्थित होते.




# शनीशिंगणापूर देवस्थानच्या आषाढी पायी दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**सोनई :** शनीशिंगणापूर देवस्थानचे महंत उदासी महाराज यांच्या आषाढी पायी दिंडीचे मंगळवारी (दि. १४) हजारो भाविकांच्या उत्स्फूर्त उपस्थितीत पंढरपूरकडे भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. विठ्ठल नामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि ''ज्ञानोबा-तुकाराम''च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सकाळी ८ वाजता महंत उदासी महाराज मठात शनी महाराजांच्या चांदीच्या पादुकांचे विधिवत पूजन देवस्थानचे कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर चांदीच्या पादुका सुशोभित रथात विराजमान करून पूजा करण्यात आली. भाविकांनी रथाला नारळ अर्पण करत दिंडीच्या यशस्वी प्रवासासाठी प्रार्थना केली. आकर्षक फुलांनी सजविलेल्या रथासमोर झेंडेकरी, डोक्यावर तुळस घेतलेल्या महिला वारकरी तसेच टाळ, वीणा आणि मृदंगाच्या साथीने हरिनामाचा गजर करणारे वारकरी अशी दिंडी मार्गस्थ झाली.

सन १९९२ मध्ये देवस्थानचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय बाबुराव पाटील बानकर यांनी सुरू केलेली ही पायी दिंडी वारकरी परंपरेचे जतन करणारी महत्त्वाची परंपरा ठरली आहे. यंदा पहिल्याच दिवशी सुमारे ६०० महिला व पुरुष वारकरी सहभागी झाले. देवस्थानच्या वतीने यावर्षी वारकऱ्यांकडून कोणतीही देणगी स्वीकारली जाणार नसून संपूर्ण प्रवासात निवास, भोजन, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सेवा व अन्य सुविधा मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने सोनई प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. सुनील वाघ यांनी प्रत्येक वारकऱ्याला मेडिकल किटचे वितरण केले. दिंडीच्या मार्गावरील प्रत्येक मुक्कामस्थळी आवश्यक व्यवस्था करण्यात आली असून शेवटचे तीन दिवस सांगोला रोड परिसरात मुक्काम होणार आहे.

प्रस्थान सोहळ्यास ज्ञानेश्वर संस्थानचे विश्वस्त विश्वासराव गडाख, हभप कारभारी महाराज पंडित, हभप बाबासाहेब महाराज घायाळ, माजी उपाध्यक्ष सुरेश बानकर, हभप अंबादास महाराज फलके, महिला भजनी मंडळ, ग्रामस्थ, भाविक आणि मोठ्या संख्येने वारकरी उपस्थित होते.

# राहुरीतील तीन नंबर प्रभागातील विविध विकास कामांसाठी आ. कर्डिलेंना साकडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी :** राहुरी नगर परिषदेच्या शहारातील प्रभाग क्रमांक ०३ मध्ये विविध विकास कामांसाठी निधी उपलब्ध करुन देणयासाठी भारतीय जनता पक्षाचे युवा कार्यकर्ते सतिष फुलसौंदर व उमेश शेळके , किशोर येवले यांनी आमदार अक्षय कर्डिले यांना निवेदन देऊन प्रभागातील विविध विकास कामांसाठी साकडे घातले आहे

नुकत्याच झालेल्या पावसामुळे शहरातील प्रभागातील प्रमुख रस्त्यांची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाल्याने नागरिक त्रस्त झाले आहे नगरपालिका प्रशासनाने याबाबत कोणतीही दखल घेत नसून त्याबाबत आमदार कर्डिले यांनी मुख्याधिकारी यांना सूचना केल्या आहेत तसेच राहुरी शहरातील प्रभाग क्रमांक ०३ मध्ये तनपुरे वाडी ते स्टेशन रस्ता रुंदीकरण करुन रस्त्याचे मजबुती करण करणे तसेच मेहेत्रे मळा ते पवार वस्ती रस्ता करण्यात यावा, बाराभाई मळा येथे बंदिस्त गटार करण्यात यावी. तनपुरेवाडी शाळा दुरुस्ती करणे, गोरख गुलदगड कॉलनी मधील ओपन स्पेस चे सुशोभिकरण करणे बाराभाई मळा १०० चे ट्रान्सफॉर्मर बसविणे, पाच नंबर नाका ते स्टेशन चौपदरीकरणाचे काम करणे,शनि मंदीर ते मुळा नदी नाला बंदीस्त गटार करणे, पाच नं. नाका ते मेहेत्रे मळा रस्ता तयार करणे, मेहेत्रे मळा (मुरलीनगर ओपन स्पेस) सुशोभिकरण करण्यात यावे आदी मागणीचे निवेदन आ. अक्षय कर्डिले यांना देण्यात आले आहे या मागणीसाठी आ. अक्षय कर्डिले हे सकारात्मक आहेत निवेदन देतेवेळी भारतीय जनता पक्षाचे युवा कार्यकर्ते सतिष फुलसौंदर, उमेश शेळके, किशोर येवले, माजी नगरसेवक सुनील पवार,गणेश खैरे आदी उपस्थित होते.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळाली भरपाई



आ. आशुतोष काळेंच्या पाठपुराव्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मिळाली भरपाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : नामांकित बहुराष्ट्रीय (मल्टी नॅशनल) बियाणे उत्पादक कंपनीकडून फसवणूक झाल्यानंतर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणे ही दुर्मीळ बाब मानली जाते. मात्र कोपरगाव विधानसभा मतदारसंघातील नुकसानग्रस्त शेतकरी याबाबत काहीसे सुदैवी ठरले असून आमदार आशुतोष काळे यांच्या निर्णायक भूमिकेमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सिजेंटा कंपनीकडून तब्बल ६ लाख २६ हजार ४०० रुपयांची नुकसान भरपाई मिळाली आहे. याबाबत सविस्तर वृत्त असे की, चालू हंगामात कोपरगाव मतदार संघातील अनेक शेतकऱ्यांनी विविध नर्सरीमधून सिजेंटा कंपनीच्या 'सिंबा' वाणाची टरबूज रोपे खरेदी करून लागवड केली होती.

मात्र या वाणाची रोपे निकृष्ट दर्जाची असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला. तसेच या वाणाला रोगप्रतिकारक क्षमता कमी असल्याने मोठ्या प्रमाणावर रोगाचा प्रादुर्भाव झाला आणि अनेक एकरांवरील टरबूज पिकाचे मोठे नुकसान झाले होते. या प्रकरणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली होती. त्यानंतर तालुकास्तरीय तक्रार निवारण समितीने २५ मार्च रोजी प्रत्यक्ष शेतात पाहणी करून अहवाल सादर केला. या अहवालात सिजेंटा कंपनीच्या 'सिंबा' वाणामुळे संबंधित शेतकऱ्यांचे शंभर टक्के नुकसान झाल्याचे नमूद करण्यात आले. तसेच कंपनीने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष केल्याचाही उल्लेख करण्यात आला होता.

शेतकऱ्यांवरील अन्यायाची दखल घेत आमदार आशुतोष काळे यांनी राज्याचे कृषी मंत्री ना.दत्तात्रय भरणे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. निकृष्ट दर्जाची रोपे पुरवून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपनीवर कठोर कारवाई करून नुकसानग्रस्तांना न्याय मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली.

तसेच कृषी विभागाने सातत्याने पाठपुरावा करण्याच्या व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळेपर्यंत प्रयत्न सुरू ठेवण्याच्या सूचना तालुका कृषी अधिकारी अधिकाऱ्यांना दिल्या. आमदार आशुतोष काळेंचा रेटा व कृषी विभागाच्या पाठपुराव्याच्या एकत्रित प्रयत्नातून अखेर सिजेंटा कंपनीने माघार घेत ७.२० हेक्टर क्षेत्रावरील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एकूण ६ लाख २६ हजार ४०० रुपयांची नुकसानभरपाई अदा केली.

याबाबतची माहिती तालुका कृषी अधिकारी मनोज सोनवणे यांनी नुकत्याच झालेल्या कृषी विभागाच्या बैठकीत आमदार आशुतोष काळे यांना दिली. बहुराष्ट्रीय बियाणे कंपनीकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची घटना अत्यंत दुर्मीळ असून, अशा प्रकारचा निर्णय प्रथमच झाल्याचे कृषी विभागातील अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले. या कारवाईमुळे कोपरगाव मतदारसंघातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, भविष्यात कोणतीही कंपनी शेतकऱ्यांची फसवणूक करण्यापूर्वी दहा वेळा विचार करेल, अशी भावना शेतकऱ्यांकडून व्यक्त होत आहे.

## द•ख•ल

### ग्रामपंचायतच्या जागेवरील अतिक्रमण हटवण्यासाठी, आमरण उपोषण

**उंदिरगाव** : तालुक्यातील उंदिरगाव येथील मिळकत क्रमांक १६१ या ग्रामपंचायतीच्या बखळ जागेवर काही नागरिकांनी कोणाचीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे अतिक्रमण केले आहे. हे अतिक्रमण तात्काळ हटवण्यात यावे, अशी मागणी स्थानिक रहिवासी दत्तात्रय साहेबराव पवार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. प्रशासनाने यावर त्वरित कारवाई न केल्यास, आज बुधवार (दि. १५) जुलै रोजी श्रीरामपूर येथील महात्मा गांधी चौकात आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा पवार यांनी दिला आहे. यासंदर्भातील मागणीचे निवेदन उंदिरगाव ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसीलदार कार्यालय, तसेच तालुका व शहर पोलीस ठाण्याला देण्यात आले आहे. या गंभीर प्रकरणी आता प्रशासन काय पाऊल उचलणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### कारेगाव येथे कृषी दूतांचे 'कापूस पिक व्यवस्थापन' चर्चासत्र



**नेवासा** : मुळा शिक्षण सोसायटी संचलित महात्मा फुले कृषी विद्यापीठ संलग्न कृषी महाविद्यालय सोनई यांच्या ग्रामीण (कृषी) जागरूकता आणि कृषी औद्योगिक कार्यानुभव कार्यक्रम २०२६-२७ अंतर्गत शेतकऱ्यांच्या बांधावर तंत्रज्ञान प्रचार-प्रसार कार्यक्रम याअंतर्गत कापूस पीक व्यवस्थापन या विषयावर बाभूळवेढे येथे शेतकरी चर्चासत्र संपन्न झाले. यावेळी कापूस लागवडीचे आधुनिक तंत्रज्ञान, योग्य वाणांची निवड, मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन,पाणी बचत तंत्रज्ञान, ठिबक सिंचन, कीड व रोग व्यवस्थापन, जैविक खतांचा वापर व नियोजन, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन तसेच उत्पादन खर्च कमी करून अधिक नफा मिळविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन कृषी दूतांनी केले. कार्यक्रमास कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हरी मोरे, प्रा. सुनील बोरुडे, प्रा. अनुप दरंदले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी डॉ. संतोष चौगुले प्रा. नरेंद्र दहातोंडे, प्रा. जयसिंग वाघमारे, प्रा. राहुल गोंधळी,सहा. कृषी अधिकारी नवनाथ भोसकर उपस्थित होते.

### वाळू तस्करांची मुजोरी ! थेट वनविभागाच्या हद्दीतून पोखरला रस्ता



**झरेकाठी** : पारनेर तालुक्यातील साकूर पठार भागातील अवैध वाळू उपशाने आता परिसीमा गाठली आहे. मुळा नदीचा पूर ओसरताच वाळू तस्करांनी चोरीसाठी एक नवी शक्कल लढवली. थेट जांबुत गावच्या स्मशानभूमीतून, वनविभागाच्या हद्दीत जेसीबी चालवून नदीकाठापर्यंत रस्ता तयार करण्यात आला. स्थानिक सुज्ञ नागरिकांनी ही बाब वनविभागाच्या निदर्शनास आणून दिली. यावर तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन वनविभागाचे अधिकारी ताम्हाणे यांनी दिले आहे. सध्या 'राजकीय आका'च्या वरदहस्तामुळे या भागातील अवैध धंदेवाल्यांची मुजोरी प्रचंड वाढली आहे. आता प्रशासन या मुजोर तस्करांवर नेमकी काय आणि कधी कारवाई करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आकाश दुबैय्या हत्या प्रकरणाच्या निषेधार्थ श्रीरामपूर बंदला सहकार्याची मागणी

**श्रीरामपूर** : हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ श्रीरामपूर शहरात सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या शहर बंदला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, अशी मागणी प्रशासनाला दिलेल्या निवेदनातून रविराज बेलदार यांनी केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, शहरातील व्यापाऱ्यांमध्ये, नागरिकांमध्ये व विविध सामाजिक संघटनांमध्ये या घटनेबाबत तीव्र संतापाची भावना असून आरोपींना कठोर शिक्षा व्हावी, अशी सर्वांची अपेक्षा आहे. या पार्श्वभूमीवर सर्वपक्षीय कृती समितीच्या नेतृत्वाखाली श्रीरामपूर शहर व बाजारपेठ बंदचे आवाहन करण्यात आले आहे. बंद शांततापूर्ण व कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवून पार पाडण्यात येणार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या बंदला स्थानिक व्यापारी, व्यावसायिक, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था तसेच विविध संघटनांनी सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच बंदच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी प्रशासनाने आवश्यक ती खबरदारी घ्यावी, तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पुरेसा पोलीस बंदोबस्त ठेवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. शहरातील शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवत बंद यशस्वी करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

### एसटीच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त श्रीरामपूर विभागीय कार्यशाळेत वृक्षारोपण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान** : महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ७८ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून विभागीय कार्यशाळा, श्रीरामपूर येथील मोकळ्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी श्रीरामपूर उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अनंता जोशी हे प्रमुख उपस्थित होते. तसेच वृक्षारोपण मोहिमेचे नियोजन व मार्गदर्शन श्रीरामपूर यंत्र अभियंता (चालन) सचिन चाचरे यांनी केले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हरित महाराष्ट्राच्या संकल्पाला बळकटी देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. लावण्यात आलेल्या वृक्षांच्या नियमित संगोपनाची जबाबदारी देखील यावेळी निश्चित करण्यात आली. कार्यक्रम प्रसंगी शरद खोत , उपेंद्र मोरे, कुलदीप म्हस्के,आण्णा दाभाडे , संदीप गवते, भूषण साळवे, दिलीप तमनर, संजय वाकचौरे,गणेश गोराणे, प्रशांत वर्पे, विठ्ठल भोये, बाबासाहेब चिंधे, हरिभाऊ विधाते आदी सह विभागीय कार्यक्षेत्रातील कार्यशाळा कर्मचारी, पर्यवेक्षकीय कर्मचारी व अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## साईबाबांची बदनामी करणाऱ्या खट्टरने मागीतली जाहीर माफी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा साई संस्थान विषयी विविध समाजमाध्यमांतून आक्षेपार्ह विधाने करणारे गौतम खट्टर यांनी आज राहाता न्यायालयात हजर राहून आपली चूक मान्य केली आहे.

त्यांनी न्यायालयासमोर नमूद केले की, श्री साईबाबा व संस्थानबाबत असलेले गैरसमज माझे दूर झाले असून, यापुढे मी कोणतेही चुकीचे वक्तव्य, मुलाखत, चर्चा किंवा भाष्य करणार नाही. सन २०२३ मध्ये श्री साईबाबांविषयी करण्यात आलेल्या आक्षेपार्ह विधानांच्या पार्श्वभूमीवर, साईबाबा संस्थानने अशा प्रकारची विधाने करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध राहाता येथील न्यायालयात कायदेशीर दावा दाखल केला होता. ज्यामध्ये अजय गौतम व गौतम खट्टर यांचा समावेश होता.

त्यापैकी अजय गौतम यांनी मागील वर्षी नोव्हेंबर महिन्यात आपली चुक मान्य करुन राहाता न्यायालयात माफीनामा सादर केला होता. याचप्रकारे गौतम खट्टर यांचेही गैरसमज दूर झाल्याने, आज त्यांनी न्यायालयात स्पष्ट केले की त्यांच्या पूर्वीच्या विधानांचा आधार हा अपुऱ्या माहितीतून झालेल्या गैरसमजांवर होता. यावेळी आयोजित पत्रकार परिषदेत गौतम खट्टर यांनी आपल्या वक्तव्याबद्दल खेद व्यक्त केला. या संपूर्ण प्रक्रियेत संस्थानचे माजी विश्वस्त मोहन जयकर, विधी अधिकारी गोरक्षनाथ नलगे व राहाता न्यायालयाचे वकिल ॲड. राजेश नाईक यांनी समन्वय साधला.

## वृक्षारोपण करून संवर्धन करणे काळाची गरज : आ खताळ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : प्रत्येकाला उत्तम ऑक्सिजन मिळावा यासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण करुण त्याचे संवर्धन कारणे काळाची गरज असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

महाराष्ट्र राज्य परिवहन एस टी महा मंडळा च्या ५८व्या वर्धापन दिना निमित्त संगमनेरआगार आणि प्रवासी सेवा संस्थेच्या वतीने संगमनेर बस स्थानक आवारामध्ये वृक्षारोपण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते एस. टी. महामंडळातर्फे हरित भविष्यासाठी संपूर्ण राज्यात वृक्षा रोपण हा उपक्रम राबविण्यात आला आहे.

यावेळी संगमनेर आगार व्यवस्थापक प्रशांत गुंड,वसंत गंभीर,प्रवासी सेवा संस्थेचे अध्यक्ष अनिल भोसले,संजय क्षत्रिय,कारभारी देव्हारे, मुरतजा बोहरी,लहानु सदगीर,शांताराम आडेप,अमित पाटणकर,नितीन मोहाले,सुरेश डग,सचिन गवारे,विनोद गायकवाड,सिमोन रुपटक्के ,बाळासाहेब हेंद्रे आदी उपस्थित होते.

## जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांचे तातडीने सर्व्हेक्षण करा : ना. विखे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : जायकवाडी प्रकल्पातील पुनर्वसित गावांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महसूल आणि जलसंपदा विभागाने एकत्रित सर्व्हेक्षण करून एक महीन्यात प्रस्ताव सादर करण्याचा सूचना जलसंपदा मंत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या. जायकवाडी प्रकल्पात पुर्नवसित झालेल्या शेवगाव नेवासा आणि गंगापूर तालुक्यातील गावांच्या समस्याबद्दल मंत्रालयात मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

बैठकीला मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील,आ.मोनिका राजळे आ.रमेश बोरनारे आ.विठ्ठलराव लंघे आ.अक्षय कर्डीले जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्यासह जलसंपदा आणि मदत व पुनर्वसन विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. बैठकीत पुर्नवसित गावात बुडीत क्षेत्र किती आहे. असलेल्या किती जमीनीमध्ये पाणी जाते याबाबतचा ड्रोण सर्व्हे करून घेण्याचे सूचित करून,जलसंपदा व महसूल विभागाने गावांमध्ये जनसुनावणी घेवून ज्यांच्या जमीनी आहेत त्या शेतकऱ्यांची माहीती महीना भरात संकलित करून त्याचा प्रस्ताव शासनाने पाठवावा. जमीन अदलाबदल, भोगावटा वर्ग एक करणे,तसेच पुर्नवसित गावात नसलेल्या सुविधांचा आढावा जिल्हाधिकारी यांनी घ्यावा यासंदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याचे निश्चित करण्यात आले.

मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी जमीनीचा सर्व्हे आल्यानंतर त्या गावातील प्रश्नाच्या संदर्भात निर्णय करण्याची ग्वाही दिली. शेतकऱ्यांच्या समस्या मांडतांना आ.मोनिका राजळे यांनी जायकवाडी प्रकल्प आधी झाला.त्यानंतर झालेल्या कायद्यामुळे शेतकऱ्यांची मोठी समस्या निर्माण झाल्याचे सांगितले.आ.विठ्ठलराव लंघे यांनी पुर्नवसित गावांच्या समस्या मोठ्या प्रमाणात आहेत.या गावांना न्याय मिळेल असे निर्णय व्हावेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

## गुन्हेगारीच्या निषेधार्थ टाकळीभान बंद
## कठोर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**टाकळीभान** : श्रीरामपूर शहरातील वाढत्या गुन्हेगारीच्या घटनांच्या निषेधार्थ आणि आकाश दुबय्या यांच्या हत्येसह टाकळीभान येथील सतीश मायकल रणनवरे यांच्यावर झालेल्या जीवघेण्या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी (१४ जुलै) टाकळीभान गाव स्वयंस्फूर्तीने कडकडीत बंद ठेवण्यात आले. व्यापारी, विविध संघटना, ग्रामस्थ आणि सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी बंदमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतला.

टाकळीभान पोलीस ठाण्यासमोर सकाळी ९ वाजता सर्वपक्षीय शोकसभा घेण्यात आली. यावेळी माजी सभापती नानासाहेब पवार यांनी श्रीरामपूर शहरासह ग्रामीण भागातही गुन्हेगारीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगितले. टाकळीभान येथील युवकावर श्रीरामपूरमध्ये किरकोळ कारणावरून जीवघेणा हल्ला झाला असून, यापूर्वीही गावात गुंडांकडून दहशत निर्माण करण्याचे प्रकार घडल्याचा उल्लेख त्यांनी केला. अशा गुन्हेगारांवर कठोर कारवाई करून त्यांची दहशत कायमची मोडून काढावी, अशी मागणी त्यांनी केली.

यावेळी राजेंद्र कोकणे, भारत भवार, नारायण काळे, अविनाश लोखंडे आदींनी मनोगत व्यक्त करत आकाश दुबय्या यांना श्रद्धांजली अर्पण केली. ग्रामस्थांनी मागण्यांचे निवेदन पोलीस हेड कॉन्स्टेबल बर्डे यांच्याकडे सुपूर्द केले. दिवसभर गावातील सर्व व्यापारी आस्थापने बंद ठेवून घटनेचा निषेध नोंदविण्यात आला.

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म-मृत्यु/एसआर/११६-२०२६
नेवासा दिनांक १०-०७-२०२६

अर्जदार श्री/श्रीम बानोबेगम अजिज शेख रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. बानोबेगम नुरमहमद सय्यद रा. सोनई, ता. नेवासा, यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहेसदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नींद होणे बावत नमूद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-बानोबेगम नुरमहमद सय्यद, गावाचे नाव- सोनई, जन्म दिनांक-०१/०६/१९७०

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गाची जन्म मृत्य रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जागीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी परतकामध्ये नोद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांक जन्म-मृत्यु/एसआर/११७-२०२६
नेवासा दिनांक १०-०७-२०२६

अर्जदार श्री/श्रीम अकबर बाबामिया शेख रा. सोनई ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन श्री/श्रीम. कु. शोएब अकबर शेख रा. सोनई ता. नेवासा यांचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे जन्म नोंद होणे बावत नमूद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-शोएब अकबर शेख, गावाचे नाव- सोनई, जन्म दिनांक-२५/०१/२००७

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म-मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये जन्म नोंद गाची जन्म मृत्य रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जागीर प्रगटना तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी परतकामध्ये नोद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहलिसदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## नेवासा फाटा,शेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर शटल बस सुरु करा : बाळासाहेब जोंधळे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : खेड्यापाड्यातून येणाऱ्या प्रवाशांची होणारी गैरसोय लक्षात घेता नेवासा येथून नेवासा फाटा,शेवगाव,पाथर्डी,अहिल्यानगर अशी शटल बस सुरू करण्यात यावी अशी मागणी शिवसेनेचे कामगार नेते बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी केली आहे. दिलेल्या निवेदनात कामगार नेते बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी म्हटले आहे की नेवासा ते नेवासा फाटा हे ५ किलोमीटर अंतर आहे.

या फाटा रस्त्याच्या दरम्यान नेवासा शहर प्रभागातील सेंट मेरीज इंग्लिश स्कूल परिसर अहिल्यानगर,संभाजीनगर, सावतानगर, ज्ञानेश्वर महाविद्यालय,नामदेवनगर, गायत्रीनगर, पावन गणपती मंदिर परिसर, गांधीनगर हा परिसर येतो. याच परिसरातील रहिवाशांना शहरात किंवा फाट्याकडे जायचे असेल तर तासन तास थांब्यावर ताटकळत उभे राहण्याची वेळ येते.

या ठिकठिकाणच्या भागातील नागरिकांचे व्यवहार नेवासाफाटा व नेवासा शहरात होत असल्याने दैनंदिन कामांसाठी शहरात किंवा नेवासा फाट्यावर यावे लागते. वृध्द नागरिकांना एसटी सवलत असल्याने ते सुद्धा बसची सतत प्रतिक्षा करत असतात. परंतु या नेवासा फाटा रस्त्यावर शटल बस नसल्याने लोकांचे मोठ्या प्रमाणात हाल होतात व रस्त्यावर ही तास न तास बसावे लागते.एस टी सवलीतीचा फायदा सर्वसामान्य नागरिकांना व्हावा म्हणून बंद पडलेल्या शेवगाव, पाथर्डी, अहिल्यानगर या शटल बस सेवा पूर्ववत सुरू कराव्यात यासाठी लवकरच शिष्टमंडळ शिवसेना नेते उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे व परिवहन मंत्र्यांना भेटणार असल्याचे बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी सांगितले. नेवासा आगाराच्या वतीने ब-याच बसेस बंद करण्यात आल्या आहेत. वाढीव बसेस या मार्गावर सुरू करण्यात याव्यात.

कित्येक दिवसांपासून बंद केलेली नेवासा- कल्याण बस सुरू करण्यात यावी त्यासाठी ही आम्ही लवकरच वरिष्ठ नेत्यांना भेटणार असल्याचे शिवसेनेचे कामगार नेते बाळासाहेब जोंधळे पाटील यांनी सांगितले.

> शटल बसेससह लांब पल्ल्याच्या बंद पडलेल्या एसटी बसेस पूर्ववत सुरू केल्यास एसटी चे उत्पन्न वाढेल. नागरिकांचा, प्रवाशांचा मनस्ताप कमी होईल याकरिता एसटी आगाराने फाटा शटल सुरू करावी लवकरच या मागणीचे निवेदन वरिष्ठांना देणार आहे.
>
> **अनिल ताके**
> **अध्यक्ष, प्रवासी संघटना नेवासा तालुका**

## घरफोडी करणारे दोघे जेरबंद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : घरात घुसून मारहाण करत रोख रक्कम लंपास करणे, तसेच घर आणि कारची तोडफोड करणाऱ्या दोन आरोपींना श्रीरामपूर शहर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत अटक केली आहे. आकाश ऊर्फ अक्षय सुरेश हुसळे (वय २७) आणि आकाश संजय पवार (वय २१, दोघे रा. दत्तनगर, ता. श्रीरामपूर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी देवेंद्र धनकुमार कटारिया (रा. नांदूर, ता. श्रीरामपूर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १० जुलै २०२६ रोजी रात्री चार अनोळखी इसमांनी त्यांच्या घरासमोर उभी असलेल्या स्कॉर्पिओ कारची लोखंडी रॉड, गज व लाकडी दांडक्यांनी तोडफोड केली. त्यानंतर आरोपींनी घरात जबरदस्तीने प्रवेश करून खिडक्यांच्या काचा फोडल्या, फिर्यादीस मारहाण केली आणि जवळील २५ हजार रुपये रोख रक्कम घेऊन पसार झाले. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ६८८/२०२६ अन्वये बीएनएसच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस निरीक्षक विशाल खुळे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे एमआयडीसी परिसरातून संशयित आकाश ऊर्फ अक्षय सुरेश हुसळे (वय २७) आणि आकाश संजय पवार यांना ताब्यात घेतले.

चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. या गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकॉ किशोर ओताडे करीत आहेत.

## पान १ वरुन

### बेगच्या फ्लॅटवर छापा; पिस्तूल, काडतुसे जप्त!

पथकाने सरस्वती कॉलनीतील 'छाजेड अपार्टमेंट'च्या पहिल्या मजल्यावरील फ्लॅटवर धाड टाकली. या फ्लॅटला बाहेरून कडी लावलेली होती. पोलिसांनी चौकशी केली असता, हा फ्लॅट अक्षय संजय छाजेड यांच्या मालकीचा असल्याचे समजल्यावर फ्लॅट मालक अक्षय छाजेड यांना तात्काळ घटनास्थळी बोलावून विचारपूस केली असता, त्यांनी हा फ्लॅट शिवांजय बाळासाहेब उंडे (वय २०, रा. पढेगाव) याला भाडेकरारावर दिला असून, या फ्लॅटमध्ये शिवांजय, त्यांची बहीण आणि दाजी सोनू बेग राहत असल्याचे सांगितले.फ्लॅट मालक आणि दोन पंचांसमक्ष पोलिसांनी फ्लॅटचे कुलूप उघडून कसून झडती घेतली. या झडती दरम्यान पोलिसांच्या हाती मुद्देमाल मिळून आला असून १ देशी बनावटीचे पिस्टल,२ जिवंत काडतुसे,एका महिलेची हॉस्पिटलची फाईल' यु सेवा टिन मेकर्स' नावाच्या दुकानाचे सोनूभाऊ असे नाव असलेले मोटारीचे बिल,वसंत कारभारी पवार यांच्या नावाचे कोरे चेकबुक आणि एटीएम कार्ड, तेथे असा एकूण २७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.या प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी सोनू उर्फ जयप्रकाश अशोक बेग (रा. सरस्वती कॉलनी, वॉर्ड नं. ७, श्रीरामपूर) हा शहरामध्ये संघटित गुन्हेगारांची टोळी चालवत असल्याचे पोलीस तपासात समोर आले. त्याच्या टोळीत अनेक सक्रिय गुन्हेगार असून, त्यांच्या माध्यमातून तो बेकायदेशीर धंदे करून आर्थिक लाभ मिळवत होता.विक्री करण्याच्या उद्देशाने तसेच शस्त्राचा धाक दाखवून संघटित गुन्हेगारी कृत्य करण्यासाठी आणि टोळी सदस्यांना पुरवण्यासाठी हे शस्त्र बाळगल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी शिवांजय बाळासाहेब उंडे (वय २०, रा. पढेगाव, ता. श्रीरामपूर),एक महिला, सोनू उर्फ जयप्रकाश अशोक बेग (रा. श्रीरामपूर ) या तिघांविरुद्ध श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९१/२०२६, आर्म क्ट कलम ३, ७, २५ (६) (७) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.सदरची यशस्वी कामगिरी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाघचौरे, उपविभागीय पोलीस अधिकारी जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीरामपूर शहरचे पोलीस निरीक्षक विशाल खैरे, पो.स.ई. आप्पासाहेब हंडाळ, म.पो. हे.कॉ.छाया गायकवाड आणि क्यु.आर.टी. अहिल्यानगर येथील पोलीस अंमलदारांच्या पथकाने केली आहे.या कारवाईमुळे श्रीरामपूर परिसरातील गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

### पावणे दोन लाखाच्या मुद्देमालासह ७ आरोपी ताब्यात

या कारवाईत बाबासाहेब ज्ञानदेव बेरड, संजय प्रभाकर तडके, भास्कर भानुदास जगधने, संजय रामा भिंगारदिवे, सुधीर डॅनियल शिंदे, महादेव सदाशिव कराळे आणि राजू भिवा मोरे या ७ जणांना जुगार खेळताना आणि खेळविताना आढळून आल्याने ताब्यात घेण्यात आले आहे. या कारवाईत पोलिसांनी आरोपींच्या अंगझडतीमधून रोख रक्कम, भ्रमणध्वनी (मोबाईल) आणि दुचाकी वाहने असा एकूण १ लाख ६७ हजार ५०० रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२ (अ) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सहाय्यक फौजदार डी. पी. पालवे करत आहेत. भिंगार पोलिसांनी केलेल्या या धडक कारवाईमुळे भिंगारसह शहरातील अवैध धंदे चालकांमध्ये खळबळ उडाली असून अवैध धंदे चालकांचे धाबे दणाणल आहेत.

### ऑपरेशन टायगर'वर ठाकरे सेनेचा कायदेशीर पलटवार!

दावा केल्यामुळे पक्षाचे विलीनीकरण घटनात्मकदृष्ट्या वैध ठरत नसल्याचा युक्तिवाद केला आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत संजय दिना पाटील, संजय जाधव, भाऊसाहेब वाकचौरे, ओमप्रकाश राजेनिंबाळकर, संजय देशमुख आणि नागेश आष्टीकर हे ६ खासदार शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या अधिकृत चिन्हावर निवडून आले होते. जून २०२६ मध्ये या सहा खासदारांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याकडे अर्ज सादर करत, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत विलीनीकरण झाल्याचा दावा केला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या एकूण ९ पैकी ६ खासदारांनी ही भूमिका घेतल्याने या संपूर्ण घडामोडींना पक्षात ऑपरेशन टायगर असे नाव देण्यात आले आहे. त्याला अरविंद सावंत यांनी आव्हान दिले.

### मंत्रिमंडळाचे आठ निर्णय : कृषी बाजार, एसटी बसस्थानके, नागरी विकासाला चालना

करून शहरांमध्ये आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्यासाठी बाजाराधारित वित्तपुरवठा उपलब्ध केला जाणार आहे.परिवहन क्षेत्रात एसटी महामंडळाच्या अतिरिक्त जागांचा पीपीपी तत्त्वावर विकास करण्यास मंजुरी देण्यात आली. जिल्हा, तालुका आणि ग्रामीण भागातील बसस्थानकांचे आधुनिकीकरण होणार असून, प्रवाशांना अधिक सुविधा उपलब्ध होतील.याशिवाय बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी रुपयांच्या विकासकामांना मंजुरी, मुक्तबंदी व परिविक्षाधीन बंदींसाठीच्या सहायक अनुदानात २५ हजारांवरून ५० हजार रुपयांपर्यंत वाढ, तसेच महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन नियमांमध्ये सुधारणा करण्यालाही मंत्रिमंडळाने हिरवा कंदील दिला आहे.

### बोल्हेगावात तरुणाचे अपहरण निर्जनस्थळी नग्न करून बेदम मारहाण

यश शिरसाठ, चेतन सरोदे आणि इतर साथीदारांना बोलावून घेतले. फिर्यादीच्या भावाने एका महिलेला विनाकारण मारहाण व शिवीगाळ केल्याचा राग आरोपींच्या मनात होता. याच कारणावरून अपहरण केलेल्या तरुणाला बोल्हेगाव परिसरातील निर्जनस्थळी एका शेतात नेऊन नग्न करून आरोपी अमीर शेख याने लाकडी दांडक्याने, तर अमानत अन्सारी, यश शिरसाठ आणि चेतन सरोदे यांनी कंबरेच्या बेल्टने व लाथाबुक्क्यांनी फैजान याला बेदम मारहाण केल्याची माहिती नागरिकांच्या चर्चेतून पुढे येत आहे. या दरम्यान तेथून जाणाऱ्या नदीम नावाच्या एका ओळखीच्या व्यक्तीने भांडण सोडवले आणि जखमी तरुणाला उपचारासाठी खाजगी दवाखान्यात दाखल केले. या घटनेचा व्हिडिओ तोफखाना पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकातील पोलिसांच्या व्हॉट्सपवर आल्यानंतर हा सर्व प्रकार उघडकीस आला. सदर घटनेबाबत भीतीपोटी पीडित तरुण किंवा त्याचे नातेवाईक तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात येत नसल्याने, अखेर पोलीस प्रशासनाने स्वतः पुढाकार घेऊन सरकारतर्फे हा गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक एकशिंगे आणि पोलीस हेड कॉन्स्टेबल साठे करत आहेत.

### बांधकाम कामगारांसाठी नवी योजना लागू

शिक्षणासाठी ६० हजार रुपये, तर परदेशात पदव्युत्तर किंवा पीएच.डी. शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संपूर्ण अभ्यासक्रम शुल्काची जबाबदारी शासन उचलणार आहे. महिला बांधकाम कामगारांना पहिल्या दोन अपत्यांसाठी प्रसूतीनंतर २५ हजार रुपयांचे अर्थसहाय्यही देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे लाखो कामगार कुटुंबांना मोठा सामाजिक आणि आर्थिक आधार मिळणार असल्याचे मंत्री फुंडकर यांनी सांगितले.

## बेकायदेशीर 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** शहरातील साईनगर परिसरात सुरू सुरू असलेल्या बेकायदेशीर 'झन्ना-मन्ना' जुगार अड्ड्यावर गंगापूर पोलिसांनी मंगळवारी (१४ जुलै)मध्यरात्री धाड टाकून १४ जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत रोख १२,०२० रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला असून सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ जुलै रोजी रात्री १२.०७ वाजण्याच्या सुमारास साईनगर येथील सनी कचके यांच्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमध्ये काही जण पैसे लावून 'झन्ना-मन्ना' जुगार खेळतअसल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी तत्काळ छापा टाकला असता सर्व आरोपी जुगार खेळताना आढळून आले. या कारवाईत शहजाद बागवान (३२),अशफाक शहा (३२), मोईन शहा (२७),सलीम बागवान (३०), शेखर लगड (३४),सचिन सोनवणे (२२), किरण बत्तीसे (२६),तौफीक शेख (२२), गणेश बेडवाल २६),अरबाजखान पठाण तडवी (२३), ईस्माईल शहा (२३), धरमसिंग राजपूत (४२), शहानूर बागवान (३०) आणि संतोष जाधव (४०) यांच्यावर कारवाई करण्यात आली.कारवाईदरम्यान आरोपींकडून अंगझडतीत मिळालेली

# गाव तेथे शाखा, घर तेथे शिवसैनिक; शिवसेना अधिक बळकट करणार : आ. खताळ

## कोकणगावात असंख्य कार्यकर्त्यांचा शिवसेनेत प्रवेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** शिवसेनेसह युवासेनेचे तालुक्यात चांगले संघटनात्मक काम सुरू असून, आगामी काळात संगमनेर तालुक्यात शिवसेनेची ताकद अधिक भक्कम करण्यासाठी 'गाव तेथे शाखा आणि घर तेथे शिवसैनिक' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. प्रत्येक गावात शिवसेना शाखा उभारून नागरिकांचे स्थानिक प्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा विश्वास आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केला.तालुक्यातील कोकणगाव येथे असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला त्यावेळी आयोजित कार्यक्रमात आ. खताळ बोलत होते. यावेळी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष रमेश शिंगोटे प्रकाश जोंधळे खंडू वायकर दीपक जोंधळे भगीरथ पानसरे पंकज



जोंधळे सचिन बोधक शैलेश वायकर सतीश वायकर दीपक वायकर मंगेश वायकर दीपक पवार रामनाथ वायकर सचिन वायकर विजय वायकर दीपक पवार वैभव जोंधळे अनिल जोंधळे अमोल जोंधळे समाधान पवार शुभम जोंधळे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला यावेळी आदित्य पवार संदीप जोंधळे सोमनाथ जोंधळे हौशीराम जोंधळे भारत जोंधळे महेश जोंधळे आणि विलास काशीद यांच्यासह शिवसेना महायुतीचे कार्यकर्ते उपस्थित होते

आमदार खताळ म्हणाले की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नेतृत्वाखाली राज्यसरकारच्या विविध लोककल्याणकारी योजना सर्वसामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत आहेत. कोकणगावात मागील काळात विविध विकासकामे पूर्ण झाली असून, आगामी काळातही मोठ्या प्रमाणावर विकासकामे हाती घेतली जाणार आहेत. विकास कामां साठी निधीची कोणतीही कमतरता भासणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केलेजळालेले अथवा नादुरुस्त वीज रोहित्र बदलण्यासाठी ग्रामस्थांना वर्गणी काढावी लागत होती. मात्र महायुती सरकारच्या काळामध्ये नागरिकांकडून एक रुपयाही न घेता तातडीने नवीन वीज रोहित्र उपलब्ध करून दिले जात आहे. वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत सुविधांवर सरकारने विशेष भर दिला असून,विविध योजनांद्वरे नागरिकांना थेट लाभ मिळत आहे.या शिवाय, तालु क्यातील सुमारे २८ हजार बांधकाम कामगारांना कामगार कल्याण मंडळाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यात आला आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत महायुतीचे सरकार असल्याने विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध होत असून, प्रलंबित कामांना गती मिळत आहे असे त्यांनी सांगितले. मेंढवन येथे १३२ केव्ही वीज उपकेंद्र मंजूर करण्यासाठी आमदार झाल्यापासून सातत्याने पाठपुरावा सुरू असून, हे उपकेंद्र कार्यान्वित झाल्यानंतर परिसरातील वीजपुरवठ्याचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागेल, असा विश्वासही आमदार खताळ यांनी व्यक्त केला. यावेळी शिवसेनेचे पदाधिकारी, युवासेनेचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांच्या अडचणीची तातडीने दखल;**
**कोकणगावात एसटी थांबविण्याच्या सूचना**

कोकणगाव येथील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी संगमनेरला ये-जा करताना एसटी बस गावात थांबत नसल्याने मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची बाब ग्रामस्थांनी आमदार अमोल खताळ यांच्या निदर्शनास आणून दिली. ''इतकी वर्षे गावात एसटी बस थांबू शकली नाही, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे,'' असे म्हणत आमदार खताळ यांनी आश्चर्य व्यक्त केले. विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी आणि त्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी कोकणगाव येथे एसटी बस नियमित थांबविण्याबाबत संगमनेरचे आगार व्यवस्थापकांना तातडीने आवश्यक त्या सूचना दिल्या जातील .

**अमोल खताळ**
**आमदार संगमनेर विधानसभा**

# युरियाचा बफर स्टॉक शेतकऱ्यांसाठी खुला करा

## काँग्रेसची कृषी विभागाकडे मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** खरीप हंगामात युरिया खताचा तुटवडा निर्माण झाल्याने शासनाच्या ताब्यातील युरियाचा बफर स्टॉक तातडीने शेतकऱ्यांसाठी खुला करावा, अशी मागणी संगमनेर तालुका काँग्रेसच्या वतीने करण्यात आली आहे. यासंदर्भात उपविभागीय कृषी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन शेतकऱ्यांची गैरसोय तातडीने दूर करण्याची मागणी करण्यात आली.निवेदनात म्हटले आहे की, सध्या बाजरी, मका व सोयाबीन या खरीप पिकांसाठी युरियाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. मात्र अनेक खत विक्रेत्यांकडे युरियाचा साठा उपलब्ध नसल्याने शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. दुसरीकडे तालुक्यात युरिया उपलब्ध असल्याची माहिती दिली जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून कृषी विभागाविषयी नाराजी वाढत आहे. तालुकाध्यक्ष अजय फटांगरे यांनी यापूर्वी लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या पुढाकारामुळे युरियाचा तुटवडा निर्माण होत नसल्याचे सांगत, सध्याच्या परिस्थितीत शासनाने तातडीने बफर स्टॉक खुला करावा, अशी मागणी केली. सचिन दिघे यांनीही शासनाने शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेऊन त्वरित निर्णय घ्यावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला. यावेळी कारखान्याचे संचालक विजय राहणे, सरपंच नवनाथ कातोरे, संदीप गुंजाळ, योगेश गव्हाणे, अरुण गुंजाळ, सागर वामन, नामदेव शिंदे यांच्यासह तालुक्यातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शासनाने तातडीने निर्णय घेऊन खरीप हंगामासाठी पुरेशा प्रमाणात युरिया उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वरे करण्यात आली.

# बीड जिल्हा क्रीडा संकुलासाठी २४.९५ कोटी निधी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बीड :** येथील जिल्हा क्रीडा संकुलाच्या उभारणीला गती देणारा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज घेण्यात आला असून क्रीडा संकुलाच्या २४.९५ कोटी रुपयांच्या अंदाजपत्रकास आणि निधी मंजुरीस आज मंत्रिमंडळाने मान्यता देण्यात आली आहे. दरम्यान तत्कालीन उपमुख्यमंत्री दिवंगत अजितदादा पवार यांच्या कार्यकाळात या क्रीडा संकूलाच्या उभारणीला प्रशासकीय मंजूरी देण्यात आली होती. उपमुख्यमंत्री, क्रीडामंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी या क्रीडा संकुलाच्या निधीसाठी सातत्याने केलेल्या विशेष पाठपुराव्यामुळेच हा मार्ग मोकळा झाला आहे. बीड जिल्ह्यातील खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या क्रीडा संकुलाचे काम हाती घेण्यात आले आहे. या क्रीडा संकुलाकरीता यापूर्वी ८ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरीत करण्यात आला होता. क्रीडा व युवक सेवा संचालनालयाकडून सादर करण्यात आलेल्या २४.९९ कोटी रुपये किमतीच्या अंदाजपत्रकास विशेष बाब म्हणून उच्च स्तरीय सचिव समिती तसेच राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली होती. या मंजुरीच्या अनुषंगाने, ३१ मार्च २०२६ च्या शासन निर्णयान्वये २५ कोटी रुपये इतका निधी आधीच वितरित करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राच्या विकासासाठी आणि स्थानिक तरुण खेळाडूंना दर्जेदार पायाभूत सुविधा मिळवून देण्यासाठी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार या सुरुवातीपासूनच आग्रही होत्या.

# वैजापूरात एका दिवसात दोन चोरीच्या घटना

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** वैजापूर शहरात सोमवारी महिलांच्या सोन्याच्या दागिन्यांच्या चोरीच्या दोन स्वतंत्र घटना घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. चंद्रपालनगर परिसरात भरदिवसा एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे गंठण दुचाकीस्वार चोरट्यांनी हिसकावून नेले, तर बसस्थानकात गर्दीचा फायदा घेत दुसऱ्या महिलेच्या पर्समधील सोन्याची माळ लंपास करण्यात आली. या दोन्ही प्रकरणांमध्ये वैजापूर पोलिसांनी अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हे दाखल करून तपास सुरू केला आहे.

पहिली घटना सोमवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास चंद्रपालनगर येथे घडली. नम्रता वाकळे या घरासमोर झाडू मारत असताना पल्सर दुचाकीवरून आलेल्या दोन युवकांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे १४ ग्रॅम वजनाचे, अंदाजे ८४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसकावून भरधाव वेगाने पलायन केले. वाकळे यांनी आरडाओरड करत पाठलाग केला. नागरिकांनीही आरोपींना पकडण्याचा प्रयत्न केला, मात्र ते पसार झाले.

दुसरी घटना दुपारी एकच्या सुमारास वैजापूर बसस्थानकात घडली. रुक्मिणी काळे या नातवासह बसमध्ये चढत असताना गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने त्यांच्या पर्समधील सुमारे अडीच तोळे वजनाची, अंदाजे ६० हजार रुपये किमतीची सोन्याची माळ चोरली. तिकीटासाठी पैसे काढताना हा प्रकार त्यांच्या लक्षात आला.

एकाच दिवशी घडलेल्या या दोन घटनांमुळे शहरातील महिलांच्या सुरक्षिततेबाबत चिंता व्यक्त होत असून पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# भिंत कोसळल्याच्या वादातून ॲट्रॉसिटी दाखल

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** शहरातील पोटे गल्ली परिसरात बांधकामाधीन घराची भिंत कोसळून एका महिलेस दुखापत झाल्याच्या घटनेनंतर झालेल्या वादातून एका व्यक्तीविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमासह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीसांत दाखल तक्रारीनुसार, तक्रारदाराने नमूद केले आहे की, त्यांच्या शेजारी राहणारे उमेश गायकवाड यांच्या नवीन घराचे बांधकाम सुरू होते. मंगळवार, दि. १४ जुलै रोजी बांधकामाधीन घराची एक भिंत अचानक कोसळली. ही भिंत तक्रारदाराच्या बहिणीच्या अंगावर पडल्याने त्या जखमी झाल्या. या घटनेत जवळ उभी असलेल्या दुचाकीचेही नुकसान झाले.

तक्रारीत पुढे म्हटले आहे की, या घटनेनंतर तक्रारदार, त्यांची पत्नी व इतर नातेवाईक यांनी उमेश गायकवाड यांना याबाबत जाब विचारला असता, त्यांनी वाद घालत जातिवाचक शिवीगाळ करून अपमान केला. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.या प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर वैजापूर पोलिसांनी पोटे गल्ली, वैजापूर येथील उमेश गायकवाड यांच्याविरुद्ध अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियमासह संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे.

# श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुलमध्ये विद्यार्थी संसद निवडणूक




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** तालुक्यातील सिद्धनाथ वाडगाव येथील श्री स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कुल मध्ये विद्यार्थ्यांना शालेय जीवनापासून नेतृत्व गुण यावे व आपल्या संविधानात दिलेला मतदानाचा अधिकार या विषयी विद्यार्थ्यांना विद्यार्थी असताना प्रत्यक्ष निवडणुकीची माहिती मिळणे यासाठी दर वर्षी ही निवडणूक शाळेचे अध्यक्ष डॉ. आबासाहेब सिरसाठ यांच्या मार्गदर्शनखाली घेतली जाते या मध्ये एक परीक्षा घेऊन जास्त गुण घेणारे विद्यार्थीच या निवडणुकीत उमेदवार असतात दिनांक ११ जुलै शनिवार रोजी प्रत्यक्ष निवडणूक घेण्यात आली या मध्ये हेड बॉय आणि हेड गर्ल या पदासाठी ही निवडणूक होती या मध्ये ३०४ विद्यार्थी व शिक्षकांनी मतदान केले या मध्ये हेड बॉय म्हणून आदिनाथ निकम१२३ तर हेड गर्ल म्हणून श्रुती राजपूत ११७ मताने निवडून आले आहे ही प्रक्रिया राबवण्यासाठी शाळेचे सचिव प्रमोद महाजन मुख्यध्यापक सुनील जाधव,समन्वयक विशाल काळुंके, स्नेहल पाटील शिक्षिका भाग्यश्री नरोडे, आरती तागड, प्रियंका कळवणे, वैष्णवी चव्हाण, वंदना चव्हाण,शीतल नरोडे, सुरेखा हिवाळे, अनन्या चव्हाण,किरण राजपूत, सोनाली लबडे, कांचन गायकवाड, कोमल काकडे,वैशाली पवार, योगेश देवबोने, नारायण राजपूत, प्रमोद दारूटे आदिनी प्रयत्न केले **उमेदवार व त्यांना मिळालेली मते** हेड बॉय साठी जय आळंजकर यास ९०, राम कोऱ्हाळे २३,ओंकार बैनाडे ६८ व आदिनाथ निकम यास १२३ मते मिळाली व आदिनाथ ला हेड बॉय म्हणून घोषित केले हेड गर्ल साठी समीक्षा पंडित ५१,शेख तन्वीर इसाक ३४,सह्याद्री चव्हाण १०२ आणि राजपूत श्रुती हिला ११७ मते मिळवून हेड गर्ल म्हणून श्रुतीला विजयी घोषित केले

# मतदार पुनर्निरीक्षण मोहिमेत ढिलाई

## २३ बीएलओंना नोटिसा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** भारत निवडणूक आयोगाच्या विशेष संक्षिप्त पुनर्निरीक्षण (एसआयआर-२०२६) अभियानात समाधानकारक कामगिरी न करणाऱ्या बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्याविरोधात वैजापूर निवडणूक प्रशासनाने धडक कारवाई सुरू ठेवली आहे. मंगळवारी उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी डॉ. अरुण जऱ्हाड यांनी अपेक्षित प्रगती न करणाऱ्या २३ बीएलओंना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या. या कारवाईमुळे निवडणूक यंत्रणेत खळबळ उडाली आहे.

याशिवाय वैजापूर विधानसभा मतदारसंघातील ५२ गावांमध्ये कार्यरत १४ बीएलओंनाही घरभेट सर्वेक्षण, एन्युमरेशन फॉर्म संकलन आणि ऑनलाइन डिजिटायझेशनमध्ये हलगर्जीपणा केल्याप्रकरणी नोटिसा देण्यात आल्या आहेत. यापूर्वी गेल्याच आठवड्यात शून्य प्रगती असलेल्या ७८ बीएलओंवरही अशीच कारवाई करण्यात आली होती. त्यामुळे अवघ्या आठवडाभरात कारणे दाखवा नोटिसा मिळालेल्या बीएलओंची संख्या १०१ वर पोहोचली आहे.

निवडणूक विभागाच्या माहितीनुसार, एसआयआर अभियानांतर्गत मतदारांची घराघरात जाऊन पडताळणी करणे, एन्युमरेशन फॉर्म भरून घेणे आणि त्याची वेळेत ऑनलाइन नोंद करणे ही अत्यंत महत्त्वाची जबाबदारी आहे. या कामात कोणत्याही प्रकारचा निष्काळजीपणा अथवा विलंब आढळल्यास संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध तत्काळ कारवाई केली जात आहे.

प्रशासनाने नोटीस प्राप्त झालेल्या बीएलओंना निर्धारित मुदतीत समाधानकारक खुलासा सादर करण्याचे आणि प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. अन्यथा विभागीय तसेच कायदेशीर कारवाईचा इशाराही देण्यात आला आहे. सलग दुसऱ्या आठवड्यात झालेल्या या कारवाईमुळे एसआयआर अभियानावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची बारीक नजर असून कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## निधन वार्ता

### मोहिनीराज डौले



**नेवासा :** नेवासा खुर्द येथील नगर अर्बन बँकेचे सेवानिवृत्त कर्मचारी मोहिनीराज गंगाधर डौले (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मोहिनीराज डौले यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा, दोन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे.नेवासा येथील सामाजिक कार्यकर्ते संतोष पा. डौले यांचे वडील होते

### निर्मला अडसुरे



**नगर तालुका :** विळद (ता. नगर) येथील निर्मला भीमराज अडसुरे (वय ७३) यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. भारतीय जनता पक्षाच्या देहरे मंडल सरचिटणीस प्रशांत अडसुरे यांच्या त्या मातोश्री होत.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

बुधवार दि .१५ जुलैं २०२६

### मिलनम डे

उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत

१२० ३४६ ३३७ | ३-९ | १३० २७० १२५

जोड: ३२-६९-१५-०४-९८

### कल्याण

उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत

१२९ ४८० ६६० | २-७ | १२४ ४६७ ३४०

जोड: २६-०७-८१-९५-७६

### मुंबैम (मेन)

उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत

१२६ ४५० १४४ | ९-२ | १५६ २४६ २२८

जोड: ९०-५२-१६-३७-२८

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

# द • ख • ल

## कांदा मार्केट येथे ट्रक चालकाचा मृत्यू

**अहिल्यानगर :** नेप्ती कांदा मार्केट परिसरामध्ये कांदा भरण्यासाठी आलेल्या केरळ राज्यातील एका ट्रक चालकाचा हृदयविकाराने मृत्यू झाल्याची घटना १३ जुलै रोजी दुपारी घडली. रेणू जोकब (वय ५३, रा. वल्लमफुलं, जि. पठाणमरीटा, राज्य केरळ) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. मृत रेणू जोकब यांना पूर्वीपासून हृदयविकाराचा त्रास होता. दि.१३ जुलै रोजी ते नगरच्या नेप्ती कांदा मार्केटमध्ये ट्रक भरण्यासाठी आले होते. काम करत असताना अचानक त्यांच्या छातीत तीव्र वेदना होऊ लागल्याने ते निपचित पडले. ही बाब त्यांचे गाडी मालक प्रमेय अब्राहम (रा. खोलू मनाली, जि. पठाण, केरळ ) यांनी त्यांना तातडीने बेशुद्ध अवस्थेत नगरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी नेले. मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. सिव्हिल हॉस्पिटलचे वैद्यकीय अधिकारी डॉ. चव्हाण यांच्या माहितीवरून कोतवाली पोलिसांनी अकस्मात मृत्यूच्या गुन्ह्याची नोंद केली आहे.

## दुचाकीवरून घराकडे जाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र पळवले

**अहिल्यानगर :** शहरातील कायनेटिक चौक ते सीना नदीच्या पुलावर रात्रीच्या सुमारास एक अत्यंत धाडसी चोरीची घटना घडली आहे. दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात चोरांनी एका महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र जबरदस्तीने खेचून पळवून नेल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पीडित महिला ही रात्रीच्या वेळी आपल्या दुचाकीवरून इंधन भरण्यासाठी जात होती. ती कायनेटिक चौकाकडून सीना नदीच्या पुलाच्या दिशेने जात असताना, मागून एका दुचाकीवर दोन अज्ञात इसम अत्यंत वेगाने आले. काही समजण्याच्या आतच, दुचाकीवर मागे बसलेल्या चोरट्याने महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मनी मंगळसूत्र जोरात खेचले. त्यानंतर दोन्ही अज्ञात चोरटे शक्कर चौकाच्या दिशेने वेगाने पळून गेले. चोरीला गेलेल्या सोन्याच्या मंगळसूत्राचे वजन सुमारे १० ग्रॅम असून त्याची किंमत अंदाजे ७० हजार रुपये एवढी आहे. या घटनेनंतर पीडित महिलेने त्वरित कोतवाली पोलीस ठाण्यात धाव घेऊन रीतसर तक्रार दाखल केली. महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदवला असून पुढील तपास सुरू केला आहे.

## भारत संचार निगम सल्लागार समितीवर पोपट गायकवाड यांची निवड



**जामखेड :** भारत संचार निगम जिल्हयाच्या सल्लागार समीतीवर पोपटराव गायकवाड यांची निवड खा.निलेश लंके यांच्या शिफारशी नुसार चेअरमन व मॅनेजींग डायरेक्टर भारत संचार निगम नवी दिल्ली उर्वशी संगवान यांनी केली आहे. यावेळी दादाभाऊ कळमकर, आ. रोहीत पवार, विजयसिंह गोलेकर, सुनिल साळवे, नासीर पठाण, डॉ. प्रकाश खंडागळे, ओंकार दळवी, वंसत सानप, समीर शेख, संतराम सुळ, सुदाम वराट, अशोक निमोणकर, मोहिद्दीन तांबोळी, मिठुलाल नवलाखा, दिपक देवमाने, अविनाश बोधले, पप्पू सय्यद, अशोक वीर, धनराज पवार, संजय वारभोग, निलेश वनारसे, विजय अवसरे, नंदुसिंग परदेशी, फारूख शेख,संतोष थोरात, दत्तराज पवार, बाळासाहेब वराट , अनिकेत चव्हाण यांनी अभिनंदन केले.

## चोंडेश्वरवाडीतील उषा साठे गोळीबार प्रकरण ; आरोपींना फाशीची शिक्षा द्या



**अहिल्यानगर :** माळशिरस तालुक्यातील अकलूज जवळील चोंडेश्वरवाडी येथे उषा साठे या महिलेवर झालेल्या कथित गोळीबार प्रकरणातील आरोपींवर कठोर कारवाई करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी दलित महासंघाच्या वतीने जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, उषा साठे या त्यांच्या पतीसोबत अनेक वर्षांपासून जगन्नाथ देशमुख यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करत होते, ६ जुलै रोजी शेतामध्ये काम करण्यासाठी गेले असता किंचाळण्याचा आवाज आला व तेथे जाऊन पाहिल्यावर उषा साठे यांच्या डोक्यात गोळी लागली होती, या घटनेत आरोपींनी उषा साठे यांच्याकडे शरीर सुखाची मागणी केली होती. यावेळी डॉ. काशिनाथ सुलाखे, संजय चांदणे, कडुबाबा लोढे, नामदेवराव चांदणे, अरुणा कांबळे, आशाताई सुलाखे, मंदाकिनी मेंगाळ, चंद्रकांत सकट, नानाभाऊ कांबळे, वरूण वाघमारे, आकाश लोखंडे, नानाभाऊ कांबळे, सुभाष सुलाखे, अशोक सुलाखे, सनी जगधने, लक्ष्मण साबळे याच्यासह संघटनेच्या इतर पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने जिल्हाधिकाऱ्यांना सादर करण्यात आले.

## कोरडगाव सोसायटीचे चेअरमनपदी मुखेकर

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील प्रतिष्ठीत समजल्या जाणाऱ्या कोरडगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी एकनाथ मुखेकर तर उपाध्यक्षपदी गोकुळ देशमुख यांची बिनविरोध निवड करण्यात आली.





माजी चेअरमन नारायण काकडे आणि माजी उपाध्यक्ष निलेश घुले यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने ही दोन्ही पदे रिक्त झाली होती. त्यानंतर नियमानुसार घेण्यात आलेल्या विशेष बैठकीत दोन्ही पदांसाठी प्रत्येकी एकच अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी एकनाथ मुखेकर आणि गोकुळ देशमुख यांची बिनविरोध निवड जाहीर केली. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीमुळे सोसायटीच्या कारभाराला नवे नेतृत्व लाभले असून शेतकरी सभासदांच्या अपेक्षा आता नव्या पदाधिकाऱ्यांवर केंद्रित झाल्या आहेत. सोसायटीमार्फत शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा, खत-बियाणे उपलब्ध करून देणे, तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ प्रभावीपणे मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. निवड जाहीर होताच संचालक मंडळ, सभासद आणि ग्रामस्थांनी एकनाथ मुखेकर व गोकुळ देशमुख यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. यावेळी सोसायटीच्या प्रगतीसाठी सर्व संचालक आणि सभासदांच्या सहकार्याने पारदर्शक व विकासाभिमुख कारभार करण्याचा निर्धार नव्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. कोरडगाव सोसायटीच्या नेतृत्वात झालेल्या या बदलामुळे सभासदांमध्ये समाधानाचे वातावरण असून आगामी काळात सोसायटीच्या माध्यमातून शेतकरी हिताचे निर्णय अधिक प्रभावीपणे राबविले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# डांबरी रस्त्याचे खड्डे मुरूमाने बुजविले!

## गटाराची पाईपलाईन फुटली । घाण पाण्याचा चिखल । दुचाकी घसरल्याने अपघात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** रस्ता डांबरी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने डागडुजी मुरुमाची केली. यावर विशेष कहर म्हणजे तो मुरूम दाबताना रोलरच्या दाबाने अंतर्गत गटाराची पाइपलाईन फुटल्याने कर्जत शहराच्या मुख्य रस्त्यावर मंगळवारी दुपारी घाण पाणी पसरल्याने पाच ते सहा दुचाकी चालक घसरून पडले. गुरुवारी संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांचा पालखी सोहळा कर्जत शहरात येणार असून सार्वजनिक बांधकाम विभागाने व्यवस्थापन केले की ? येणाऱ्या भाविकांची गैरसोय ? हा प्रश्न अनुत्तरित राहिला.

कर्जत शहरातून अहिल्यानगर-बारामती हा महामार्ग जातो. या महामार्गावर शेकडो वाहने आवक-जावक करीत असून संत सद्गुरु गोदड महाराज प्रवेशद्वार ते भांडेवाडीच्या परिसरात या मार्गावर लहान-मोठे अनेक खड्डे पडले आहेत. पावसात या खड्ड्याची अधिकच दुर्दशा झाली आहे. २५ जुलै रोजी आषाढी एकादशी असून या



मार्गावर विठ्ठलाच्या दर्शनासाठी अनेक भाविक-भक्त कर्जतहुन करमाळामार्गे पंढरपूरकडे जाणार आहे. तसेच गुरुवार, दि १६ रोजी नाशिक-त्रिंबकेश्वर येथील संतश्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज यांचा पालखी रथ कर्जतमध्ये येणार असून यासाठी तालुका प्रशासनाकडून जय्यत तयारी सुरू देखील आहे. मात्र कर्जतच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने शहराच्या मुख्य डांबरी रस्त्यावर चक्क लालमाती मिश्रित मुरूम टाकला. यावर कहर म्हणजे तो मुरूम दाबताना रोलरचा वापर करण्यात आला. रोलरच्या दाबाने रस्त्यावर अंतर्गत असणारी गटारचा पाईप फुटला आणि मैलमिश्रित पाणी चक्क रस्त्यावर वाहू लागले. काही काळातच हे पाणी मुख्य रस्त्यावर पसरत मुरूम टाकलेल्या ठिकाणी चिखल झाला. या चिखलात दुचाकी वाहने घसरल्याने चालकांना लहान-सहान दुखापतीस सामोरे जावे लागले. सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्ता दुरुस्ती करीत दिलासा दिला की ? सर्वसामान्य नागरिकांची आणखी अडचण वाढवली हा प्रश्न मात्र अनुत्तरितच राहिला. गुरुवारी संत निवृत्तीनाथ महाराज यांचा पालखी सोहळा कर्जत शहरात येणार असून स्थानिक तालुका प्रशासनाने यावर योग्य तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी सर्वसामान्य कर्जतकरांनी व्यक्त केली.

## टाकळी कडेवळीत संत निळोबाराय दिंडीचे स्वागत



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** पिपळणेर पारनेर येथून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या संत निळोबाराय महाराज दिंडीचे श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी कडेवळीत ग्रामस्थांनी अत्यंत उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात स्वागत केले. गावाच्या प्रवेशद्वारापासून रांगोळ्यांनी सजावट करण्यात आली होती. जेसीबीच्या साह्याने वारकऱ्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली, तर फटाक्यांच्या आतषबाजीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

यावेळी टाकळी कडेवळीत ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे पदाधिकारी, पंचायत समितीचे अधिकारी व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच आरोग्य विभाग, पशुवैद्यकीय विभाग, अग्निशमन दल आणि पोलिस प्रशासनाने आवश्यक सुविधा व सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करून दिली होती. दिंडीच्या मार्गावर चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.लाल बहादूर शास्त्री विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी पारंपरिक वेशभूषेत आणि विठ्ठल नामाच्या अखंड गजरात वारकऱ्यांचे स्वागत करून उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या सादरीकरणामुळे वातावरण अधिकच भक्तिमय झाले.मुक्कामासाठी आलेल्या विविध दिंड्यांतील वारकऱ्यांसाठी गावकऱ्यांनी ठिकठिकाणी भोजन व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली. ग्रामस्थांच्या सेवाभावी वृत्तीमुळे वारकरीही भारावून गेले.

## पावसाअभावी पीक वाचवताना शेतकऱ्यांची धडपड

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**कासार पिंपळगाव :** जुलै महिना अर्ध्यावर आला तरी अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. अधूनमधून पडलेल्या किरकोळ सरींवर पाथर्डी तालुक्यातील कासार पिंपळगाव,आदिनाथनगर,पागोरी पिंपळगाव,चितळी,पाडळी परीसरात शेतकऱ्यांनी खरीप पिकांची पेरणी पूर्ण केली असली, तरी सलग पाऊस नसल्याने पिकांच्या उगवणीसह वाढीवर गंभीर परिणाम होत आहे.दिवसेंदिवस वाढणारे ऊन, कोरडे वातावरण आणि सोसाट्याचा वारा यामुळे कोवळी पिके करपू लागल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.पाथर्डी तालुका हा प्रामुख्याने कोरडवाहू शेतीचा आहे. सिंचनाच्या मर्यादित सुविधा, मोठ्या धरणांचा अभाव आणि भूजलावर असलेले अवलंबित्व यामुळे येथील शेती पूर्णपणे पावसावरच अवलंबून आहे. यावर्षी मात्र पावसाने सुरुवातीपासूनच हुलकावणी दिल्याने खरीप हंगाम संकटात सापडला आहे. उर्वरित क्षेत्रातील शेतकरी दमदार पावसाच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या आठवड्यापासून पावसाने पूर्णपणे पाठ फिरवल्याने शेतात ओलावा टिकून राहिलेला नाही. परिणामी, उगवलेली पिके दुपारच्या उन्हात मरगळू लागली असून पिकांच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहीर, बोअरवेल सारखी सिंचनाची सुविधा आहे.ते शेतकरी ठिबक सिंचन,स्पिकंलर मोठ्या खर्चाने पिके वाचविण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र बहुतांश शेतकरी पावसा शिवाय हतबल झाले आहेत.वेळेत दमदार पाऊस न झाल्यास पेरणीचे क्षेत्र आणखी घटण्याची भीती व्यक्त होत आहे. त्याचबरोबर बियाणे, खते आणि मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पावसाच्या या अनिश्चिततेमुळे उत्पादनात मोठी घट, आर्थिक नुकसान आणि खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती व्यक्त होत आहे. दरम्यान हवामान विभागाने येत्या काही दिवसांत चांगल्या पावसाची शक्यता व्यक्त केली असली, तरी प्रत्यक्षात दमदार पाऊस झाल्या शिवाय दिलासा मिळणार नाही. सध्या परिसरातील शेतकरी आकाशाकडे डोळे लावून पावसाची प्रतीक्षा करीत आहेत. पाणी टंचाई आणि चाऱ्याची समस्या गंभीर जाणवत आहे.

## शिष्यवृत्ती परीक्षा ही प्रशासकीय सेवेत जाण्याची पहिली पायरी : मुटेकर



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शहरटाकळी :** गुरु हे आपले ईश्वर आहे. स्त्री ही आदिशक्ती आहे. सज्ञान समाज घडविण्याचे कार्य स्त्री करते. मुलगी शिकली तर राष्ट्राची प्रगती होते. आई-वडिलांच्या विश्वासाला कधीच तडा जाऊ देऊ नका. शिष्यवृत्ती परीक्षातील यश हे प्रशासकीय सेवेत जाण्याची पहिली पायरी आहे असे गौरवोद्गार शेवगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शंकरराव मुटेकर यांनी केले. ते आज कर्मयोगी आबासाहेब काकडे शैक्षणिक समूहाच्या शहरटाकळी विद्यालयात विद्यार्थ्यांना 'कायदेविषयक मार्गदर्शन' कार्यक्रमात अध्यक्ष स्थानावरून बोलत होते. यावेळी आबासाहेब काकडे, स्व.निर्मलाताई काकडे व विद्येची देवी सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर प्राचार्या अंजली चिंतामण, पोपट खताळ, पो.ह. गणेश काळे, किशोर सरसे, पालक भाऊसाहेब गुंड, यव्हान कोल्हे,विजय कावले, गणेश शिंदे, संदीप गवळी व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी शिष्यवृत्ती पात्र ९ विद्यार्थ्यांचा व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचा प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच कर्मयोगी आबासाहेब काकडे जयंती पंधरवडा निमित्त विद्यालयात आयोजित गणित- विज्ञान प्रश्नमंजुषा, रांगोळी, चित्रकला, क्रीडा, निबंध, सुंदर हस्ताक्षर स्पर्धा,काव्यलेखन स्पर्धातील विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते संस्थेच्या वतीने व विद्यालयाच्या वतीने बक्षीस व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. पुढे बोलताना मुटेकर साहेब म्हणाले की, आपल्याला 'बॅड टच आणि गुड टच' ओळखता आले पाहिजेत. सोशल मीडियाचा वापर अत्यंत काळजीपूर्वक करा. मोबाईल वापर फक्त चांगल्या कामासाठीच करा.

## वारकऱ्यांची सेवा हीच आमची विठ्ठलभक्ती : गलांडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** आषाढी वारीच्या निमित्ताने शहरात आगमन करणाऱ्या विविध दिंडींचे एमआयडीसीतील नगर-मनमाड मार्गावर उद्योजक, कामगार आणि बालाजी सेवा सोसायटीच्या वतीने अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात स्वागत करण्यात आले. विठ्ठलनामाच्या अखंड गजरात, टाळ-मृदुंगाच्या निनादात आणि भक्तिमय वातावरणात वारकऱ्यांचे स्वागत करण्यात आले. दिवसभर चाललेल्या या सेवाभावी उपक्रमात विविध दिंडींमधील सुमारे १० हजारांहून अधिक वारकऱ्यांना पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या, अल्पोपहार तसेच उपवासाचे साहित्य वाटप करण्यात आले. याचबरोबर दिंडीतील वारकरी निरोगी राहावेत आणि प्रवासात कोणत्याही आरोग्यविषयक अडचणी उद्भवू नयेत, यासाठी डॉक्टरांची विशेष टीम दिवसभर सेवेसाठी कार्यरत होती.

## डॉन बॉस्को परिसरात धोकादायक विजेचे खांब

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** सावेडी परिसरातील डॉन बॉस्को भागामध्ये खराब अवस्थेतील विजेचे खांब, झुकलेल्या विद्युत तारा तसेच रस्त्याच्या उंचीमुळे धोकादायकरीत्या खाली आलेल्या वीजवाहिन्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर परिसरातील विजेचे खांब व खाली आलेल्या तारांची तातडीने दुरुस्ती करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता चव्हाण यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. यावेळी धीरज लोणारे, आदित्य काकडे, रोहिणी अंकुश, सुनंदा हिरवाळे, हेमलता कांबळे, शोभा भिंगारदिवे, सुरेखा फुलपगार, रेश्मा भिंगारदिवे, सुनिता दिवे, सुरेखा बारसे, संगीता अकोलकर, ताराबाई भिंगारदिवे, विमल खरात, पल्लवी खरात आदी नागरिक उपस्थित होते. डॉ. सागर बोरुडे यांनी सांगितले की, डॉन बॉस्को परिसरातील विजेच्या धोकादायक परिस्थितीबाबत २० मार्च २०२६ रोजी सावेडी विभागाचे सहाय्यक अभियंता यांना लेखी निवेदन देण्यात आले होते.

## श्रीक्षेत्र भाळवणी दिंडीचे पंढरपुरकडे प्रस्थान



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**भाळवणी :** सालाबाद प्रमाणे श्रीक्षेत्र भाळवणी ते श्रीक्षेत्र पंढरपूर दिंडीचे येथील श्री नागेश्वर मंदिराच्या प्रांगणातून नुकतेच प्रस्थान झाले असून दिंडीचे हे २४ वे वर्ष आहे. वै.ह.भ.प. बबन महाराज पायमोडे व ह.भ.प. ब्रम्हचारी दत्तदिगंबर महाराज शहापूर यांच्या आशिर्वादाने आषाढी एकादशी निमित्त शेकडो भाविकांच्या उपस्थितीत भाळवणी येथून विठ्ठल नामाचा जयघोष करत मोठ्या उत्साहात दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी ह.भ.प. राधाकृष्ण शिंदे महाराज, बाबासाहेब महाराज दळवी, हिराबाई महाराज जाधव, ह.भ.प. डॉ. सुनिल गंधे, संतोष पारख, सरपंच सौ. लिलिबाई रोहोकले, मंजाभाऊ चेमटे, भानुदास तरटे, सुर्यभान रोहोकले, बाबुशेठ रोहोकले, संदीप ठुबे, कैलास उपाध्ये, झुंबर रोहोकले, विश्वनाथ रोहोकले, ज्ञानदेव रोहोकले, ज्ञानदेव कुंडलिक, सदाशिव पळसकर, गंगाधर रोहोकले, जालिंदर रोहोकले, कानिफ तरटे, आप्पा भुजबळ, संतोष रोहोकले मेजर, भाऊसाहेब रोहोकले मेजर, विणेकरी गिताराम रोहोकले, अरुण कपाळे, बळीराम सुरसे, सचिन रोहोकले, छबन कपाळे, डॉ. राजेंद्र रोहोकले, डॉ. सुरेश शिंदे, प्रा. केशव चेमटे, रावसाहेब थोरात, महिला व पुरुष भाविक सहभागी झाले आहेत.

## १०० टक्के एस.एस. आर.चे काम पूर्ण

**लिंपणगाव :** विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील भाग क्रमांक २१ चे बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) रमेश करपे यांनी १०० टक्के एसएसआरचे काम यशस्वीरीत्या पूर्ण केल्याबद्दल त्यांचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, अहिल्यानगर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी रमेश करपे यांच्या कर्तव्यदक्षतेचे, परिश्रमाचे आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केले. मतदार यादीची अचूकता, पारदर्शकता आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी बूथ लेव्हल ऑफिसरची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, सर्व बीएलओंनी रमेश करपे यांच्या कार्याचा आदर्श घेऊन आपली जबाबदारी गुणवत्तापूर्ण आणि वेळेत पूर्ण करावी, असे आवाहनही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केले. या सत्कार समारंभास निवडणूक शाखेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मतांसाठी आम्ही... आणि रोजगारासाठी कोण?

## रामवाडीत रंगली कष्टकऱ्यांची चहावर चर्चा

## स्थानिक कचरा वेचकांनी मांडल्या व्यथा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** रामवाडी येथे आयोजित कष्टकऱ्यांची चहावर चर्चा या बैठकीत महिला व पुरुष कचरा वेचकांची विविध विषयावर चर्चा रंगली होती. यामध्ये शहरातील कचरा वेचक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही चर्चा बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेच्या सहकार्याने प्रायोगिक तत्त्वावर (पायलट प्रकल्प) आयोजित करण्यात आली होती. यावेळी २० कचरा वेचकांना सुरक्षा साहित्य (सेफ्टी किट) वितरित करण्यात आले.

या उपक्रमातून कचरा वेचकांच्या सुरक्षिततेबरोबरच त्यांच्या हक्क, सन्मान आणि रोजगाराच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली. बैठकीत सुभद्राबाई उल्हारे, अलका उल्हारे आणि इतर कचरा वेचकांनी अनेक वर्षांपासून शहराची स्वच्छता राखण्यासाठी योगदान देऊनही रोजगाराची शाश्वती, सामाजिक सुरक्षा, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य आणि सन्मान यांसारख्या मूलभूत सुविधांची आवश्यकता अधोरेखित केली.

स्थानिक कचरा वेचकांना रोजगाराच्या संधींमध्ये प्राधान्य मिळावे, जेणेकरून अनेक कुटुंबांचा उदरनिर्वाह सुरक्षित होईल, अशी एकमुखी मागणी करण्यात आली. मतांसाठी आम्ही... आणि रोजगारासाठी कोण? हा प्रश्न उपस्थित करत स्थानिक श्रमिकांना न्याय मिळावा, अशी भावना व्यक्त करण्यात आली. चर्चेदरम्यान बेंगळुरूमधील हसरू दला संस्थेने कचरा वेचकांच्या संघटन, सुरक्षा आणि सक्षमीकरणासाठी राबविलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली. पायलट प्रकल्पांतर्गत वितरित करण्यात आलेल्या २० सेफ्टी किटचा अनुभव सकारात्मक असून, भविष्यात अशा सुविधा अधिकाधिक कचरा वेचकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी स्थानिक कचरा वेचकांना रोजगारात प्राधान्य, ओळखपत्र, गणवेश, सुरक्षा साहित्य, आरोग्य विमा, सामाजिक सुरक्षा योजना आणि नियमित उपजीविकेची हमी यासाठी संबंधित यंत्रणांकडे सातत्याने पाठपुरावा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

बैठकीच्या शेवटी कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायत यांच्या नेतृत्वाखाली कचरा वेचकांना अधिक संघटित करून त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी लोकशाही मार्गाने पुढील भूमिका निश्चित करण्याचा निर्णय घेण्यात येणार असल्याची माहिती संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी माहिती दिली.

आम्ही केवळ मतदार नाही; आम्ही शहर स्वच्छ ठेवणारे श्रमिक आहोत. आमच्या श्रमाचा सन्मान, आमच्या हक्कांचे संरक्षण आणि स्थानिक कचरा वेचकांना रोजगारात योग्य प्राधान्य मिळावे, अशी भावना उपस्थित कचरा वेचकांनी व्यक्त केली.

# भंडाऱ्याच्या सुवर्णवर्षावात जेजुरीत माऊलींचे जंगी स्वागत

मयुर कुदळे। राष्ट्र सह्याद्री

**जेजुरी :** श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्याचे सोमवारी (ता. १३ जुलै) जेजुरी नगरीत भक्तिभाव, उत्साह आणि जल्लोषात स्वागत करण्यात आले. ज्ञानोबा-तुकारामच्या अखंड नामगजरासह येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषणांनी जेजुरीची सुवर्णनगरी दुमदुमून गेली. माऊलींच्या पालखीवर भंडाऱ्याची मुक्त उधळण आणि फुलांचा वर्षाव करत भाविकांनी दर्शनाचा आनंद लुटला.

दिवे घाटाचा खडतर टप्पा पार करून तसेच सासवड येथील दोन दिवसांचा मुक्काम पूर्ण करत पालखी सोहळा नवीन पालखी तळावर दाखल झाला. माऊलींच्या आगमनाची प्रतीक्षा करणाऱ्या जेजुरी व परिसरातील हजारो भाविकांनी रस्त्यांच्या दुतर्फा गर्दी केली होती. टाळ-मृदुंग, विणा आणि हरिनामाच्या गजरात संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सर्व आधुनिक सुविधांनी सुसज्ज अशा नवीन पालखी तळावर ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचा हा सलग पाचवा मुक्काम ठरला. प्रांत कार्यालय, तहसील प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि जेजुरी नगरपरिषदेने पालखी सोहळ्यासाठी व्यापक नियोजन केले होते. नियंत्रण कक्ष, स्वागत कक्ष, विद्युत व्यवस्था, स्वच्छता, तलाव परिसराचे संरक्षण, तात्पुरती स्वच्छतागृहे, पिण्याच्या पाण्याची



टँकर व्यवस्था, अग्निशमन यंत्रणा तसेच जेजुरी ग्रामीण रुग्णालयामार्फत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या.

पालखी सोहळ्याच्या सुरक्षिततेसाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन आणि सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या सर्व उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या. तसेच पालखी तळाकडे जाणाऱ्या मार्गावरील धोकादायक अवस्थेतील जुन्या कमानीचे नगरपरिषदेने यापूर्वीच सुरक्षितरीत्या विसर्जन करून वारकऱ्यांचा मार्ग अधिक सुरक्षित केला होता.

यावेळी विविध सामाजिक संस्था, सेवाभावी संघटना आणि मंडळांनी वारकऱ्यांसाठी मोफत अन्नदान, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, औषध वाटप आणि इतर सेवा उपक्रम राबविले. प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक नागरिक यांच्या समन्वयातून जेजुरीतील पालखी मुक्काम यंदाही यशस्वी आणि संस्मरणीय ठरला.जेजुरीतील मुक्काम पूर्ण करून संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा पालखी सोहळा मंगळवारी (ता. १४ जुलै) वाल्हेच्या दिशेने पुढील प्रवासासाठी प्रस्थान करणार आहे.

## दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'दादा फाऊंडेशन'चा सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**जेजुरी :** दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ स्थापन करण्यात आलेल्या जेजुरीतील दादा फाऊंडेशनच्या वतीने संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यानिमित्त वारकऱ्यांच्या सेवेसाठी भव्य सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाअंतर्गत वारकऱ्यांना १५ हजार पाण्याच्या बाटल्या तसेच १० हजार राजगिरा चिक्कीचे मोफत वाटप करण्यात आले.

संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो वारकरी जेजुरीत दाखल झाले होते. या वारकऱ्यांना पिण्याचे स्वच्छ पाणी व अल्पोपहार उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने दादा फाऊंडेशनने हा सेवा उपक्रम हाती घेतला. दिवसभर चाललेल्या या उपक्रमाचा हजारो वारकऱ्यांनी लाभ घेतला. फाऊंडेशनच्या पदाधिकारी व सदस्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने पाणी आणि राजगिरा चिक्कीचे वाटप करून वारकऱ्यांची सेवा केली.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या सामाजिक विचारांचा व लोकसेवेचा वारसा जपण्याच्या उद्देशाने दादा फाऊंडेशनची स्थापना करण्यात आली असून, भविष्यातही विविध समाजोपयोगी उपक्रम सातत्याने राबविण्यात येणार असल्याची माहिती नगरसेवक योगेश जगताप यांनी दिली.

यावेळी जेजुरी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, नगरसेवक योगेश जगताप, राहुल घाडगे, वैभव कोरपड, राष्ट्रवादी काँग्रेसचे रमेश लेंडे, शिवराज झगडे यांच्यासह जेजुरी नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगरसेवक, दादा फाऊंडेशनचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. वारकऱ्यांनी या सेवाभावी उपक्रमाचे स्वागत करत आयोजकांचे कौतुक केले.

द•ख•ल

## सासवड एस टी आगारात वृक्षारोपण



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**माळशिरस :** राज्य परिवहन महामंडळाचा ७८ वा वर्धापन दिन नुकताच झाला त्या निमित्ताने राज्यातील सर्व आगारात वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे त्या मोहिमेचा शुभारंभ आज सर्वत्र करण्यात आला सासवड एस टी स्थानकातही आज चाफ्याच्या झाडांची लागवड करत या मोहिमेला सुरवात करण्यात आली आगार प्रमुख वृषाली तांबे, स्थानक प्रमुख मोहिनी ढेरे, भाजपा एनजीओ सेल चे जिल्हाध्यक्ष संतोष जगताप, सासवड पथारी संघटनेचे संचालक गुलाब सोनवणे, स्व एकनाथकाका जगताप प्रतिष्ठानचे सचिव हेमंत ताकवले सेवानिवृत्त सांख्यिकीय अधिकारी सुरेश लोणकर यांसह एस टी कर्मचारी, अधिकारी याप्रसंगी उपस्थित होते वृक्षारोपणा बरोबरच एसटी स्टँड परिसराचे शुशोभीकारण करण्यात येणार असल्याचे आगार प्रमुख तांबे यांनी या वेळी सांगितले. एस टी स्थानक परिसरात लोकसहभागातुन आंबा फणस व अन्य जंगली झाडे लावण्यात येणार असल्याची माहिती वृषाली तांबे व मोहिनी ढेरे यांनी दिली. वृक्षारोपण कार्यक्रमास एस टी कर्मचारी संघटनेचे सुरेश कडू, संतोष भोंगळे,, लेखाकार अमित वाल्मिकी, वाहतूक नियंत्रक कैलास जगताप, पोपट जैनक,प्रवीण गायकवाड महेशभोंगळे व काही वाहक चालक व कार्य शाळेतील व लेखा विभागतील कर्मचारी तसेच महादेव शिवरकर, महादेव खेंगरे आदी मंडळी या प्रसंगी उपस्थित होती.

## लोककल्याणकारी योजनांच्या जागरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**पुणे :** आषाढी वारीत राज्य शासनाने घेतलेल्या विविध लोककल्याणकारी योजनांची माहिती नागरिकांनी होण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे 'संवादवारी' या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आज लोणी काळभोर, यवत, सासवड व जेजूरी येथे आयोजित या उपक्रमास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला आहे. या उपक्रमात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६, महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण, प्रधानमंत्री पीक विमा योजना, लेक लाडकी योजना, मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना, कृषी विभागाचे डिजीटल उपक्रम, हरित उर्जा, प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, प्रधानमंत्री ग्राम सडक योजना, कौशल्य विकास व गुंतवणूक, महात्मा फुले जन आरोग्य योजना, कामगार कल्याण योजना दिव्यांग सक्षमीकरण, महाराष्ट्र रोजगार हमी, शास्वत जलसंपदा व्यवस्थापण व विकास, जलयुक्त शिवार, मागेल त्याला शेततळे, आश्रम शाळा सुविधा, नमो शेतकरी महासन्मान निधी, महाराष्ट्र कृषी कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण आदी योजनांबाबत आकर्षक एलईडी चित्ररथ तसेच पथनाट्य व प्रदर्शनाद्वारे जनजागृती करण्यात येत आहेत.

## आषाढी वारीसाठी पथकर सवलत पास वितरण; आरटीओ पुणे येथे स्वतंत्र कक्ष

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** आषाढी वारीसाठी पंढरपूरला जाणाऱ्या येणाऱ्या भाविक व वारकऱ्यांच्या हलक्या व जड वाहनांना शासन निर्णयानुसार दि. ६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पथकरातून सूट देण्यात येणार आहे. यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे खटला विभागात स्वतंत्र कक्ष सुरू करण्यात आला आहे.पथकर सवलतीचा स्टिकर/पास मिळविण्यासाठी वाहनधारकांनी दि. २९ जुलै २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत वाहनाचे नोंदणी प्रमाणपत्र, विमा, पीयूसी, कर, परवाना, योग्यता प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करून पास प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी केले आहे.

# स्व.अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त 'राष्ट्रवादी'च्या वतीने बारामतीत उपक्रम

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने संपूर्ण जुलै महिना 'जनसेवा महिना' म्हणून विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत रविवार, दि. १९ जुलै रोजी महा रक्तदान शिबिर तसेच बुधवार, दि. २२ जुलै रोजी नागरिकांना ११ हजार मोफत वृक्षरोपांचे वाटप करण्यात येणार असून, बारामतीकरांनी या उपक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. किरण इंगळे यांनी केले आहे. बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने १ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत सामाजिक बांधिलकी जपत विविध जनहिताचे




उपक्रम राबविण्यात येत आहेत. यामध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण, महा रक्तदान शिबिर, नेत्र तपासणी शिबिर,शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी,मोतीबिंदू शस्त्रक्रिया, अन्नदान,योग शिबिर, पावसाळी रेनकोट वाटप आदी उपक्रमांचा समावेश आहे. समाजातील उपेक्षित घटकांना प्रत्यक्ष मदत मिळावी आणि सामाजिक सेवेला चालना मिळावी, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

रविवार, दि. १९ जुलै रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ६.०० या वेळेत शारदा प्रांगण येथील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष कार्यालयात महा रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

करू रक्तदान, वाचवू रुग्णाचे प्राण या संदेशातून अधिकाधिक नागरिकांनी रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान द्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर बुधवार, दि. २२ जुलै रोजी सकाळी ९.३० वाजता शारदा प्रांगण येथे नागरिकांना विविध देशी वृक्ष तसेच फळझाडांची ११ हजार मोफत रोपे वितरित करण्यात येणार आहेत. हरित बारामती, सुंदर बारामती, स्वच्छ बारामती या संकल्पनेला बळकटी देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून, पर्यावरण संवर्धनासाठी प्रत्येक नागरिकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भास्करराव पानसरे जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्य

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** तांबे (ता. जुन्नर) येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयाचे दिवंगत शिक्षक कै. भास्करराव पानसरे यांच्या जयंतीनिमित्त विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. शाळेच्या माजी विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून आयोजित या उपक्रमाला विद्यार्थी, पालक आणि ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कै. भास्करराव पानसरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ माजी विद्यार्थी गेल्या चार वर्षांपासून हा उपक्रम सातत्याने राबवत असून, यंदा या उपक्रमाचे चौथे वर्ष होते. विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या गुणवत्तेला बळ मिळावे, या उद्देशाने शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अभियंता नामदेव तोते होते. यावेळी सरपंच मीराबाई मडके, विधिज्ञ ललित जोशी, विद्यालय व्यवस्थापन समितीचे चेअरमन यशवंत मडके, यशवंत पानसरे, वनपरिक्षेत्र अधिकारी शशिकांत मडके, मुख्याध्यापक हेमंतकुमार नांगरे, सुनील लोकरे, किरण वाळुंज, किरण लोकरे, पांडुरंग भांगे, शिक्षक गोविंद मडके, शिवाजी मडके, किसन मडके, सुनील मिंढे, निलेश मडके, एकनाथ पानसरे, विश्वास ढोले, उल्हास मिंढे, राजाराम मिंढे, उल्हास वाळुंज, मंगेश मिंढे, गणपत



मडके, सुशील मडके आणि भगवान वाळुंज यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले.

यावेळी माजी विद्यार्थी, पानसरे कुटुंबीय, विद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी कै. भास्करराव पानसरे यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि विद्यार्थीहिताच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या आठवणींना उजाळा दिला. विशेष म्हणजे, पुढील वर्षीही हा उपक्रम अखंडपणे सुरू राहावा यासाठी शिष्यवृत्ती निधी विद्यालयाकडे जमा करण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांना सातत्याने शैक्षणिक प्रोत्साहन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अरुण मातेरे यांनी केले, तर आभार मुख्याध्यापक हेमंतकुमार नांगरे यांनी मानले.

# इतर मागासवर्गीयांसाठी स्वयंरोजगार व उच्च शिक्षणासाठी कर्ज योजना

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत इतर मागासवर्गीय प्रवर्गातील पात्र नागरिकांना स्वयंरोजगार, उद्योग व्यवसाय आणि उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज व व्याज परतावा योजनांचा लाभ उपलब्ध करून दिला जात आहे.

पात्र लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.महामंडळामार्फत वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना (१५ लाख रुपयांपर्यंत), गट कर्ज व्याज परतावा योजना (१० ते ५० लाख रुपये), महिला स्वयंसिद्धी व्याज परतावा योजना (५ ते १० लाख रुपये), शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना (देशांतर्गत १० लाख व परदेशी शिक्षणासाठी २० लाख रुपये) तसेच १ लाख रुपयांपर्यंतची थेट कर्ज योजना राबविण्यात येत आहे.

पात्र लाभार्थ्यांनी बँकांकडून मंजूर झालेल्या कर्जावरील व्याज परतावा योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.इच्छुकांनी ू. ीललषवल.ीसरू या संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावा. अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी, येरवडा, पुणे येथे अथवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२९५२३०५९ वर संपर्क साधावा, असे आवाहन महामंडळामार्फत करण्यात आले आहे.

# एयर फोसची जाचक अट व म्हाडाच्या पुनर्वसनासाठी मानवी साखळी आंदोलन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** १९८० साली निकृष्ट दर्जाची म्हणून घोषित करण्यात आलेल्या म्हाडा वसाहतीतील एल-टाइप व एम-टाइप घरांच्या पुनर्विकासाचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. एअर फोर्स आणि एमईएस कॉलनी परिसरातील बांधकाम निर्बंधांमुळे सुमारे ८०० गाळेधारकांचे पुनर्विकासाचे स्वप्न रखडल्याचा आरोप रहिवाश्यांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर गाळेधारकांना न्याय मिळावा आणि पुनर्विकासाचा मार्ग तातडीने मोकळा करावा, या मागणीसाठी आज माजी आमदार सुनील टिंगरे व माजी उपमहापौर डॉ.सिद्धार्थ धेंडे यांच्या नेतृत्वाखाली रहिवाश्यांनी मानवी साखळी करीत तीव्र आंदोलन केले .या वेळी म्हाडा व एअर फोर्स चा निषेध करण्यात आला.आंदोलन सकाळी ११ वाजता एमईएस




कॉलनी गेट येथे, एअर फोर्स व राज्य शासनाचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणासमोर, पोस्ट ऑफिससमोर, येरवडा येथे करण्यात आले .

यावेळी म्हाडा च्या रहिवाश्यांची घरे मोडकळीस आली असून त्यांना तत्काळ न्याय मिळावा तसेच शासनाच्या बांधकामाला एक न्याय व गरीब रहिवाश्यांना एक न्याय हा दुजाभाव खपवून घेणार नसल्याचा इशारा माजी उपमाहपौर डॉ.सिद्धार्थ धेंडे यांनी यावेळी दिला .मुख्यमंत्री,पालकमंत्री सुनेत्रा वहिनी पवार व खासदार पार्थ पवार यांच्या माध्यमातून आपण हा प्रश्न सोडवण्यासाठी तातडीने प्रयत्न करणार असल्याचे माजी आमदार सुनील टिंगरे यांनी यावेळी नागरिकांना आश्वासन दिले .तसेच न्याय मिळेपर्यंत आपण या लढ्यात सहभागी होणार असल्याचे त्यांनी सांगितले .यावेळी नगरसेविका सौ. नंदिनी सिद्धार्थ धेंडे, नगरसेविका सौ. शीतल सावंत, नगरसेवक सुहास टिंगरे आणि नगरसेवक रवीभाऊ टिंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# दरोड्याच्या तयारीतील आंतरराज्यीय टोळी जेरबंद

## सहा आरोपी अटकेत, १४.८७ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**आळेफाटा :** पुणे ग्रामीण पोलिसांनी ओतूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठी कारवाई करत दरोड्याच्या तयारीत असलेल्या आंतरराज्यीय दरोडेखोरांच्या टोळीतील सहा जणांना अटक केली आहे. आरोपींकडून गावठी पिस्तूल, जिवंत काडतुसे, धारदार शस्त्रे तसेच चोरीची बोलेरो जीपसह एकूण १४ लाख ८७ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून महाराष्ट्र व तेलंगणातील २० गंभीर गुन्ह्यांची उकल झाली आहे. सोनूकसिंग कपूरसिंग टाक (३०, हडपसर, पुणे), पिलूकसिंग शेरसिंग दुधानी (४०, खोपोली, रायगड), करणसिंग गगनसिंग टाक (२७, परभणी), पंकजसिंग काळूसिंग शिकलगार उर्फ दुधानी



(४०, अंबरनाथ), पापीसिंग उर्फ कृष्णसिंग साहेबसिंग टाक (१८, परभणी) आणि मंगलसिंग मायासिंग दुधानी (५८, परभणी) या सहाही आरोपींना ताब्यात घेतले.

अटक करण्यात आलेले आरोपी हे सराईत गुन्हेगार असून त्यांच्याकडून चौकशीदरम्यान दरोडा, दरोड्याचा प्रयत्न, जबरी चोरी, घरफोडी आणि वाहनचोरीचे एकूण २० गुन्हे उघडकीस आले आहेत. यामध्ये दोन दरोडे, एक दरोड्याचा प्रयत्न, दोन जबरी चोरी, १३ घरफोडी आणि दोन वाहनचोरीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. तसेच या आरोपींवर यापूर्वी महाराष्ट्र, तेलंगणा व इतर राज्यांत ५० हून अधिक गंभीर गुन्हे दाखल असल्याचे तपासात समोर आले आहे. या कारवाईमुळे महाराष्ट्र आणि तेलंगणात सक्रिय असलेल्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीचा मोठा पर्दाफाश झाला असून पुढील तपासातून आणखी गुन्हे उघड होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

ही कारवाई पुणे ग्रामीणचे पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल अप्पर पोलीस अधीक्षक शुभम कुमार, जुन्नर उपविभागीय पोलीस अधिकारी धनंजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, दत्तात्रय गुंड,सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार, ज्ञानेश्वर बाजगीरे, पोलीस उपनिरीक्षक युवराज जाधव,पोलीस हवलदार आंनदा भवारी, बाळशीराम भवारी, धनंजय पालवे, सुरेश गेंगजे, दिनेश साबळे, नामदेव बांबळे, नरेंद्र गोराने, देविदास खेडकर, रोहित बोंबले,दिपक साबळे, राजू मोमीन, संदीप वारे, अक्षय नवले,मनोज राठोड, संगीता मधे, रेश्मा फाफाळे, ज्योतीराम पवार,सुभाष केदारी,विशाल गोडसे,योगेश उकिरडे, गौरी काळे आणी परिसरातील ग्रामस्थांच्या मोलाच्या सहकार्याने करण्यात आली आहे.

# एसआयआर कार्यक्रमाचा केंद्रीय उपनिवडणूक आयुक्तांकडून आढावा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मतदार यादी त्रुटीमुक्त व अचूक तयार करण्यावर भर देत प्रत्येक टप्प्यावरील काम निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करावे, तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्या कामाचा नियमित आढावा घेऊन प्रगतीचे सातत्याने परीक्षण करावे, अशा सूचना भारत निवडणूक आयोगाचे उप निवडणूक आयुक्त ग्यानेश भारती यांनी दिल्या.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत त्यांनी पुणे विभागातील विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी भारत निवडणूक आयोगाचे प्रधान सचिव अजोय कुमार झा, उप सचिव अभिनव अग्रवाल, राज्याचे उप मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर, विभागीय आयुक्त शीतल तेली-उगले, पुणे महानगरपालिका आयुक्त नवलकिशोर राम, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त विजय सुर्यवंशी, विभागातील जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, विजय राठोड, मैनाक घोष, सहआयुक्त स्वाती देशमुख, संजीव पलांडे, तुषार ठोंबरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल कळसकर उपस्थित होते. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम, जिल्हाधिकारी संतोष पाटील व एस. कार्तिकेयन हे दूरदृश्यप्रणालीद्वारे सहभागी होते.

उप निवडणूक आयुक्त श्री. भारती यांनी संबंधित अधिकारी आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमातील प्रत्येक काम सर्वोच्च प्राधान्याने आणि जबाबदारीने पार पाडावे, असे सांगितले. कामातील त्रुटी तातडीने दूर करून अपेक्षित उद्दिष्टे वेळेत गाठण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करावा. कार्यक्रमासाठी निश्चित करण्यात आलेली कालमर्यादा काटेकोरपणे पाळावी. मतदार यादी त्रुटीमुक्त करण्यासाठी गणना फॉर्म भरताना प्रत्येक मतदाराची माहिती काळजीपूर्वक पडताळून अचूक नोंद करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांनी घरोघरी भेटी देऊन प्रत्येक मतदाराची माहिती प्रत्यक्ष पडताळावी, असे सांगितले. मतदार यादीमध्ये कोणतीही चूक किंवा त्रुटी राहणार नाही यासाठी विशेष दक्षता घेण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. सर्व कागदपत्रांचे काम नियमानुसार आणि परिपूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याबरोबरच आवश्यक अर्ज, नोंदी, छायाचित्रे आणि इतर संबंधित कागदपत्रांची अचूक पूर्तता करण्यावर त्यांनी भर दिला. मतदारांच्या तक्रारी आणि हरकतींचे त्वरित व प्रभावी निराकरण व्हावे यासाठी पुणे जिल्ह्यात मंडलनिहाय सुनावण्या घेण्याऐवजी संबंधित मतदान केंद्रांवरच सुनावणी घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

द•ख•ल

## पाथर्डीच्या पायी पालखी दिंडी सोहळ्याचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे विठ्ठल गजरात प्रस्थान




**पाथर्डी :** सालाबादप्रमाणे यावर्षीही शहरातील कसबा विभागातील संतश्रेष्ठ श्री सावता महाराज मंदिर ते श्री क्षेत्र पंढरपूर या पायी पालखी दिंडी सोहळ्याचे पाथर्डी येथुन विठ्ठल गजरात प्रस्थान झाले. यावेळी आ. मोनिका राजळे यांनी पालखी समोर श्रीफळ वाढवून पालखी पुजन व संतपुजन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी नगराध्यक्ष अभयराव आव्हाड, उपनगराध्यक्षा मंगल कोकाटे, मोहन महाराज सुडके, नगरसेवक सुभाष बोरुडे, नगरसेविका मंगल सोनटक्के, गणेश सोनटक्के, बाळासाहेब सोनटक्के, रमेश गोरे, राजेंद्र दुधाळ, राजेंद्र उदारे, सुरेश काटे, बाबु बोरुडे आदींसह शेकडो भाविक ग्रामस्थ उपस्थित होते. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत सावता महाराज व विठुनामाचा गजर व जयघोष करत शेकडो वारकऱ्यांसह पालखी पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ झाली. यावेळी शुभेच्छा देताना आ. राजळे म्हणाल्या की, आषाढी वारीचा हा सोहळा केवळ परिसराला केवळ भक्तीचा साज चढवणारा नाही तर संस्कृती, परंपरा जपत मानवता आणि संतांच्या शिकवणीचा मार्ग दाखवणारा अध्यात्माचा विचार देणारा आहे.

## अवैध मुरूम उत्खनन ; कारवाईची मागणी सोनटक्के यांचे बेमुदत बैठा सत्याग्रह



**पाथर्डी :** शहरातील ग्रामदैवत रामगिरीबाबा टेकडी परिसरात सुरू असलेल्या टेकडी सुशोभीकरण व उद्यान विकास कामात मोठ्या प्रमाणावर कथित अवैध मुरूम उत्खनन झाल्याचा गंभीर आरोप करत सामाजिक कार्यकर्ते अरविंद सोनटक्के यांनी तहसील कार्यालयासमोर बेमुदत बैठा सत्याग्रह सुरू केला आहे. संबंधित प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करावेत, शासनाचा लाखो रुपयांचा महसूल बुडवल्याबद्दल जबाबदारांवर कठोर कारवाई करावी, अशी त्यांची प्रमुख मागणी आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, रामगिरीबाबा टेकडी परिसरातील उद्यान विकासाच्या कामादरम्यान टेकडीच्या एका बाजूने मोठ्या प्रमाणावर खोदकाम करण्यात आले आहे. या कामासाठी केवळ सुमारे ५०० ब्रास मुरूमाची रॉयल्टी भरून प्रत्यक्षात हजारो ब्रास मुरूमाचे अवैधरित्या उत्खनन करण्यात आले असून त्याची विल्हेवाट लावण्यात आली, असा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

## ॲड. ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार नोकरी मेळाव्याचे आयोजन



**पाथर्डी :** शेवगाव-पाथर्डी मतदारसंघातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ज्येष्ठ नेते ॲड. प्रताप ढाकणे यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रोजगार नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी नोकरी मेळाव्याच्या पोस्टरचे अनावरण करण्यात आले. पाथर्डी शहरातील हिंद वस्तीगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत पुणे येथील युवा हब स्किल मॅनेजमेंट चे संचालक व या नोकरी मेळाव्याचे संयोजक किरण रहाणे व दिपक पवार यांनी दिली. यावेळी शिवशंकर राजळे, बंडु बोरुडे, नगरसेवक देवा पवार, सुरेश हंडाळ, योगेश रासने, बाळासाहेब सोनटक्के, दिगंबर गाडे, अक्रम आतार, शिवाजी बडे, एम.पी.आव्हाड उपस्थित होते. हा मेळावा शनिवारी एम. एम. निऱ्हाळी उच्च माध्यमिक विद्यालय, पाथर्डी येथे होणार आहे. या रोजगार मेळाव्यात औद्योगिक, शैक्षणिक आर्थिक व विविध १६ सेक्टर मधील महाराष्ट्रातील ८५ हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नामांकित कंपन्या सहभागी होणार असून विविध शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

## वारकऱ्यांच्या सेवेसाठी आरोग्यदिंडी!

**श्रीगोंदा :** सेवा हीच परमोच्च धर्म या भावनेतून श्रीगोंदा मेडिकल असोसिएशनने यंदाच्या आषाढी वारीनिमित्त वारकऱ्यांसाठी विशेष 'वारकरी मेडिकल चेकअप कॅम्प' आयोजित केला आहे. १५ ते २२ जुलै २०२६ या कालावधीत पंढरपूर वारी मार्गावरील विविध ठिकाणी मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून दिली जाणार असून, असोसिएशनच्या डॉक्टरांचा मोठा चमू या सेवेत सहभागी होणार आहे. या उपक्रमांतर्गत वारकऱ्यांची सर्वसाधारण आरोग्य तपासणी, रक्तदाब, रक्तातील साखर, हृदय तपासणी, मोफत औषधांचे वाटप तसेच तज्ज्ञ डॉक्टरांचा वैद्यकीय सल्ला दिला जाणार आहे.

# अंगणवाडीच्या बांधकामावरून चिचोंडीत 'जोर बैठका'!

### जि.प.च्या पत्रानंतर हालचालींना वेग : ग्रामपंचायतीतील गुप्त बैठकीचे गूढ

**बाळासाहेब गदादे । राष्ट्र सह्याद्री**

**चिचोंडी पाटील :** नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथील माणिकनगर परिसरातील रखडलेल्या अंगणवाडी इमारतीचे प्रकरण दिवसेंदिवस नवे वळण घेत आहे. अंगणवाडीचे काम सुरू न झाल्याबाबत जिल्हा परिषद बांधकाम विभागाने ग्रामपंचायतीकडे पत्राद्वारे विचारणा करत काम तातडीने सुरू करण्याच्या सूचना दिल्यानंतर आता ग्रामपंचायत कार्यालयात काही माजी ग्रामपंचायत सदस्यांची बैठक झाल्याची चर्चा गावात रंगली आहे. विशेष म्हणजे, ज्या प्रभागातील अंगणवाडीचे काम रखडले आहे, त्याच प्रभागातील काही संबंधित माजी सदस्यांना या बैठकीचे निमंत्रण देण्यात आले नसल्याची चर्चा असल्याने ग्रामस्थांमध्ये अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.

ही बैठक नेमकी कोणाच्या पुढाकाराने बोलावण्यात आली होती? बैठकीचा अधिकृत विषय काय होता? बैठकीत अंगणवाडीच्या रखडलेल्या कामाबाबत चर्चा झाली का? आणि जर झाली असेल, तर ज्या प्रभागाशी हा प्रश्न थेट संबंधित आहे, त्या प्रभागातील माजी सदस्यांना चर्चेपासून दूर का ठेवण्यात आले? अशा प्रश्नांमुळे गावातील चर्चांना उधाण आले आहे.

अंगणवाडी बांधकामाचे प्रकरण यापूर्वीच प्रशासकीय दिरंगाई आणि कामाच्या मुदतीतील तफावतीमुळे चर्चेत आले आहे. उपलब्ध कागदपत्रांनुसार, जिल्हा परिषदेने ५ डिसेंबर २०२५ रोजी ग्रामपंचायतीला कार्यारंभ आदेश देऊन चार महिन्यांत काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर ग्रामपंचायतीने निविदा प्रक्रिया राबवून १९ जानेवारी २०२६ रोजी ठेकेदाराची नियुक्ती करत नऊ महिन्यांची मुदत दिल्याचे समोर आले. त्यातच काम सुरू न झाल्यामुळे जिल्हा परिषद बांधकाम विभागाकडून ग्रामपंचायतीला पत्र पाठविण्यात आले. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर झाल्याची चर्चा असलेल्या बैठकीमुळे प्रकरणातील उत्सुकता आणखी वाढली आहे.

ग्रामस्थांमध्ये सुरू असलेल्या चर्चेनुसार, या बैठकीत नेमके कोणते निर्णय घेण्यात आले, याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही. त्यामुळे अंगणवाडी बांधकाम प्रकरणावर चर्चा करण्यासाठी ही बैठक होती का, जिल्हा परिषदेच्या पत्रानंतर पुढील भूमिका ठरविण्यासाठी बैठक घेण्यात आली का, की अन्य कोणत्या विषयासाठी माजी सदस्यांना बोलावण्यात आले होते, याबाबत तर्क-वितर्क सुरू झाले आहेत.

**बैठकीमध्ये ठरले तरी काय?**

ग्रामपंचायत कार्यालयात झाल्याची चर्चा असलेल्या बैठकीत नेमक्या कोणत्या विषयावर चर्चा झाली? बैठकीचा अधिकृत अजेंडा काय होता? अंगणवाडी बांधकामाचा विषय चर्चेला आला होता का? आणि संबंधित प्रभागातील माजी सदस्यांना निमंत्रण का देण्यात आले नाही? याबाबत संबंधितांनी स्पष्ट खुलासा करावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. अन्यथा या प्रकरणाभोवती निर्माण झालेला संशय आणि तर्क-वितर्क आणखी वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




**त्याच ठेकेदाराला काम देणे योग्य का?**

संबंधित ठेकेदाराने सदरचे काम मुदत संपून देखील अद्याप सुरू केलेले नाही त्यामुळे आता जिल्हा परिषदेच्या पत्रानंतर या अंगणवाडीचे काम परत त्याच ठेकेदाराला द्यावे का हा देखील मोठा प्रश्न निर्माण होत आहे.

## 'शेतकऱ्यांच्या दारी योजना की ठराविकांच्या घरीच मेवा?'

### श्रीगोंदा कृषी कार्यालयावर पक्षपातीपणाचे आरोप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

सरकारी योजनांची माहिती सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही.कृषी सहाय्यक ठराविक लोकांनाच भेट देत असल्याचा आरोप.पात्र शेतकरी अनुदान व योजनांपासून वंचित.तक्रारींवर केवळ आश्वासने; प्रत्यक्ष कृतीचा अभाव.मात्र लाभ मिळताना काही ठराविक लोकांनाच मिळतो याचे उत्तर मात्र मिळालेच नाही त्यामुळे कृषी विभागाच्या कामकाजाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी.

**सगळं काही ऑनलाईन आहे.**
**तालुका कृषी अधिकारी क्रांती चौधरी**

**श्रीगोंदा :** भारत हा कृषिप्रधान देश म्हणून ओळखला जात असला, तरी प्रत्यक्षात शेतकऱ्यांची होणारी ससेहोलपट चिंताजनक बनली आहे. श्रीगोंदा तालुक्यात तर सरकारी कृषी योजना आणि अनुदानाची माहिती सर्वसामान्य शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नसून ती केवळ ठराविक लोकांपुरतीच मर्यादित राहत असल्याचा गंभीर आरोप शेतकरी वर्गातून होत आहे. श्रीगोंदा तालुका कृषी कार्यालयाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, अनुदाने, प्रशिक्षण, पीकविमा, कृषी यांत्रिकीकरण, बियाणे व इतर शासकीय सुविधांची माहिती सर्व शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मोजक्याच लोकांना त्याचा लाभ मिळत असल्याची भावना ग्रामीण भागात तीव्र झाली आहे गावागावात नियुक्त असलेले कृषी सहाय्यक नियमित दौरे करत असले तरी ते बहुतांश वेळा ठराविक शेतकऱ्यांनाच भेट देतात, असा आरोप अनेक गावांतून केला जात आहे. त्यामुळे माहितीच्या अभावामुळे अनेक पात्र शेतकरी शासकीय योजनांपासून वंचित राहत असल्याची खंत व्यक्त होत आहे. याबाबत तालुका कृषी कार्यालयात तक्रार केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून गोड बोलून समजूत काढली जाते; मात्र प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल होत नसल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली आहे. त्यामुळे तालुका कृषी अधिकारी तसेच सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या कामकाजाबाबत मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त होत आहे.शेतकरी संघटनांनी या प्रकरणाची सखोल चौकशी करून प्रत्येक गावातील लाभार्थी यादी, योजनांचा लाभ आणि कृषी सहाय्यकांच्या कामकाजाचे सामाजिक लेखापरीक्षण करण्याची मागणी केली आहे.

## टाकळी ढोकेश्वरमध्ये घडले हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

**टाकळी ढोकेश्वर :** हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा असणाऱ्या पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथे वै. ह. भ. प. बबन महाराज पायमोडे यांच्या पायी दिंडीचे श्री क्षेत्र पंढरपूरकडे प्रस्थान होत असताना मुस्लिम बांधवांनी हजरत सुफी इस्माईलशहा बाबा दर्गाह येथे या दिंडीचे उत्साहात स्वागत केले.यावेळी दिंडी रथावर पुष्पवृष्टी करून वारकऱ्यांना अल्पोपहार देण्यात आला.दिंडी चालकांच्या वतीने बाबांच्या दर्ग्यावर चादर अर्पण करण्यात आली. मुस्लिम जमातचे अशपाक हवलदार यांनी सर्वांचे स्वागत केले. चाँद शेख यांनी या उपक्रमाचे विवेचन करताना दिंडी पारंपरेतील हिंदू-मुस्लिम ऐक्याची विविध उदाहरणे देत दरवर्षी दिंडी स्वागताची प्रथा जपली जाणार असल्याचे सांगितले. वारकरी व सुफी संप्रदाय यात अनेक समान दुवे असून हे दोन्ही पंथ समानतेची व मानवतेची शिकवण देताना कर्मकांडाला थारा देत नाहीत.

## शाळेतील चिमुकले वारीसोबत



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** पंढरपूरच्या वारीतील दिंडी हा वारकरी संप्रदायाचा आत्मा आहे. टाळ-मृदुंगाचा गजर, मुखी 'ज्ञानोबा-तुकाराम' नामस्मरण, डोक्यावर तुळशी वृंदावन, आणि खांद्यावर भगवी पताका यामुळे भक्तीचा आणि आनंदाचा एक वेगळाच संगम शाळेतील चिमुकल्यांनी आज अनुभवला. नगर शहरातील मुकुंदनगर येथील यशवंतराव गाडे विद्यालयातील स्काऊट - गाईडच्या युनिटच्या वतीने एक दिवस दिंडी सोबत उपक्रम राबवण्यात आला. यावेळी शाळकरी मुलांनी दिंडीतील वयोवृद्ध वारकऱ्यांची सेवा करून त्यांना चहा, पाणी तसेच अल्पोपहार दिला. वारीत जात, पात, किंवा आर्थिक भेद नसतो,सर्वजण एकमेकांना नम्रतेने ' माऊली ' संबोधतात. चालताना होणारे विठ्ठलाचे नामस्मरण आणि दुपारच्या विसाव्यात होणारे हरिपाठ-कीर्तन मनाला असीम शांतता आणि आनंद देतात. दिंडीतील वारकरी अनोळखी असूनही एकमेकांची प्रेमाने विचारपूस करतात आणि सुख-दुःख वाटून घेतात, वारी दरम्यान होणाऱ्या गोल आणि उभ्या रिंगणात वारकरी आनंदाने नाचतात, काही दिंड्यांमध्ये पारंपारिक लोकनृत्य आणि फुगडी खेळून आनंदोत्सव साजरा केला जातो.

## श्री क्षेत्र भगवानगड पायी पालखी सोहळ्याचे पंढरपूरकडे प्रस्थान



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगडाच्या पालखीचे आषाढी एकादशीनिमित्त आज सोमवार दि.१३ जुलै रोजी पंढरपूरकडे प्रस्थान झाले. श्री क्षेत्र भगवानगडाचे संस्थापक, ऐश्वर्यसंपन्न श्री संत भगवानबाबा यांनी नारायणगडावर असतानाच मराठवाड्यातून पहिला पायी पालखी सोहळा प्रारंभ केला होता. पालखीचे मुक्काम अनुक्रमे भारजवाडी, बावी, खोकरमोह, करंजवन, डिघोळ, जयवंतनगर, कुंबेफळ, आवार पिंपरी, कुर्डुवाडी, ढेकळेवाडी या ठिकाणी होऊन अकराव्या मुक्कामाला पालखी पंढरपूरमध्ये पोहोचते. दरम्यान प्रस्थानापासून ते पंढरपूरमध्ये पोहोचेपर्यंत अनेक दिंड्या भगवानगडाच्या पायी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी होतात. यामध्ये प्रामुख्याने अंभोरे येथील भोसले महाराजांची दिंडी, गुंजमुर्ती संस्थान, शेषाबाई संस्थान तांबवा, रामगड संस्थान, विठ्ठलगड संस्थान, रामेश्वर संस्थान, भगवानबाबा संस्थान सुपेसावरगांव, भोगलवाडी संस्थान, राजा हरिश्चंद्र संस्थान, जवळा ग्रामस्थ, बोरकिन्ही ग्रामस्थ, भाग्येश्वर संस्थान तरडगव्हण, गणपतबाबा संस्थान सावरगाव, कुमंडलेश्वर संस्थान घोगस पारगांव, सिद्धेश्वर संस्थान शिरुर कासार, मायंबा संस्थान भालगांव, भगवानबाबा संस्थान छत्रपती संभाजीनगर-पैठण-आळंदी, कानिफनाथ संस्थान खडकवाडी, केशवराज संस्थान वारणी,निरंजन संस्थान एकनाथवाडी, सुदर्शन गड संस्थान पाटणसांगवी, जय हनुमान संस्थान राणेगांव, दुर्गाशक्तीगड भिलवाडे, कानिफनाथ संस्थान खर्डा, हनुमान टाकळी संस्थान, शहर टाकळी संस्थान, कानिफनाथ संस्थान खोकरमोह, सालसिद्धेश्वर संस्थान मिडसांगवी, संत भगवानबाबा संस्थान तागडगांव इत्यादी संस्थानांचा समावेश होतो.

## भव्य रिंगण सोहळ्याने अवतरली पंढरी..



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी : श्री क्षेत्र पिंपळनेर येथून पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या संत श्रेष्ठ श्री निळोबारायांच्या मानाच्या पालखी सोहळ्याचे बेलवंडी येथे अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन झाले. पालखीच्या स्वागतासाठी संपूर्ण बेलवंडी नगरी सजली होती. यावेळी आयोजित करण्यात आलेल्या भव्य गोल रिंगण सोहळ्याने उपस्थित भाविकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. 'आनंदाचे डोही आनंद तरंग' या उक्तीप्रमाणे आज बेलवंडी गावामध्ये भक्तीचा अनोखा उत्साह पाहायला मिळाला.**

विठू नामाचा गजर, टाळ-मृदंगाचा नाद आणि 'ज्ञानबा-तुकाराम' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. वारकऱ्यांची पावले पंढरीच्या दिशेने पडत असताना, बेलवंडीत झालेल्या या रिंगण सोहळ्याने गावाला जणू 'प्रति पंढरी' चे स्वरूप प्राप्त करून दिले होते.

ग्रामप्रदक्षिणा झाल्यानंतर गावातील मुख्य मैदानावर बहुप्रतिक्षित गोल रिंगण सोहळा पार पडला. यामध्ये मानाच्या अश्वाने मारलेली धाव आणि वारकऱ्यांनी फुगड्या खेळत, हरिनामाच्या गजरात घेतलेले फेर उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले. यावेळी पो. नि. नंदकुमार सोनवलकर यांनी पोलीस ठाण्याजवळ वारकऱ्यासाठी अल्पोपहाराचे नियोजन केले होते.

यावेळी अण्णासाहेब शेलार, अनुराधा नागवडे, हिंदवी पाटील, सचिन कातोरे, पो.नि. संजय ठेंगे, ऋषिकेश शेलार, बाळासाहेब ढवळे, उत्तम डाके, विजय काळाने, ज्ञानदेव शेलार, सुनिल ढवळे यांच्यासह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील अनेक मान्यवर आणि भाविक उपस्थित होते.

## तिसगावमध्ये अमावस्येला वाहतूक कोंडी

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**तिसगाव :** तिसगाव येथे प्रत्येक अमावस्येला सकाळपासूनच मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असून वाहनचालक व भाविकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. विशेषतः तिसगाव नदीवरील पुलापासून मढी रस्त्यापर्यंतच्या राष्ट्रीय महामार्गावर वाहतुकीचा ताण वाढत असल्याने परिस्थिती गंभीर बनत आहे.स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, महामार्ग वाहतूक पोलीस या ठिकाणी वेळेवर पोहोचत नसल्याने कोंडी अधिक वाढते. पाथर्डी पोलीस ठाण्याच्या वाहतूक शाखेचे कर्मचारी आल्यानंतरच वाहतूक काही प्रमाणात सुरळीत होत असल्याचे चित्र आहे. राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाने रस्ता तयार करताना आवश्यक त्या ठिकाणी डिव्हायडर न बसवल्यामुळे अनेक बेशिस्त वाहनचालक समोर वाहतूक कोंडी असतानाही तीन-तीन रांगांमध्ये वाहने उभी करतात. त्यामुळे समोरील वाहनांना मार्ग मिळत नाही आणि कोंडी अधिकच वाढते. या कोंडीचा परिणाम शेवगाव, नगर व मढीकडे जाणाऱ्या वाहतुकीवरही होत असून अनेक वाहने दीर्घकाळ अडकून पडतात.

त्यामुळे प्रत्येक अमावस्येला महामार्ग वाहतूक पोलीस, पाथर्डी पोलीस वाहतूक शाखा आणि राष्ट्रीय महामार्ग प्रशासन यांनी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे, तसेच आवश्यक त्या ठिकाणी वाहतूक नियंत्रणासाठी कर्मचारी व बॅरिकेड्सची व्यवस्था करावी, अशी मागणी ग्रामस्थ यांनी केली आहे.

# निवृत्तीनाथांच्या पालखीसाठी आमटी भाकरीचा महाप्रसाद

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** येथील श्री निवृत्तीनाथ दिंडी सोहळा सोमवारी (दि.१३) सायंकाळी साकतखुर्द (ता. नगर) येथे सायंकाळी दाखल झाला. पालखी सोहळ्याचे साकत गावात आगमन होताच ग्रामस्थांनी फटाक्यांच्या आतषबाजी तसेच पुष्पवर्षाव करत पालखीचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले गेले. हरीनामाच्या जायघोषाने साकतखुर्द दुमदूमले. दिंडीचे आगमन झाल्यानंतर साकतसह परिसरातील भाविकांनी सोहळा पाहण्यासाठी व दर्शनासाठी गर्दी केली होती. परंपरेनुसार चालू असलेल्या प्रथेने दोन हजार लिटर आमटी भाकरीचा महाप्रसाद बनविण्यात आला होता.

सोमवारी सकाळपासूनच साकत खुर्द येथील वातावरण भक्तिमय झाले होते. सायंकाळी पालखी सोहळा साकत खुर्द येथे आल्यानंतर ग्रामस्थांनी पालखीचे स्वागत केले. तसेच ग्रामस्थांनी पालखीला खांद्यावर घेऊन मोठ्या भक्तिभावाने गावात आणले. यावेळी झालेल्या 'ज्ञानोबा तुकाराम' च्या जयघोषाने ग्रामस्थांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. सायंकाळी पालखीचे विधिवत पूजन तसेच आरती करुण किर्तन सोहळा पार पडला. यानंतर दिंडी सोहळ्यातील सर्व भाविक भक्तांना आमटी-भाकरीचा महाप्रसाद देण्यात आला. अहिल्यानगर येथील दोन दिवसांच्या मुक्कामा नंतर संतश्रेष्ठ श्री निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्याचा मुक्काम साकतखुर्द येथे असतो. या पार्श्वभूमीवर साकतखुर्द ग्रामस्थ आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने सुरुवातीपासूनच मोठी जय्यत तयारी करण्यात आली होती. राज्यातील प्रमुख दिंड्यापैकी पंढरपूर येथे मान असलेली ही दिंडी महत्वपूर्ण मानली जाते. यावर्षी सुमारे पन्नास ते पंच्चावन्न हजार वारकरी या सोहळ्यात सहभागी झाले आहेत. दिंडी आगमनामुळे संपूर्ण साकत गावात उत्साहाचे वातावरण झाले होते. पालखी सोहळा यशस्वीतेसाठी सरपंच, उपसरपंच, ग्रा.पं. सदस्य, सेवा सोसायटीचे सर्व आजीमाजी पदाधिकारी, ग्रामस्थ, गावातील तरुण मंडळे, यांनी परिश्रम घेतले.

**पोलीस प्रशासनाचा चोख बंदोबस्त !**

पालखी सोहळ्या दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये तसेच कायदा व सुव्यवस्था आबाधित राखण्यासाठी नगर तालुका पोलीस प्रशासनातर्फे चोख बंदोबस्त ठेवऱ्यात आला. यासाठी नगर तालुका पोलीस ठाण्याचे स. पो. नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. उप. नि. उमेश पतंगे, पो. उप. नि.गायकवाड व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.



**महाप्रसादासाठी बनवली दोन हजार लिटर 'आमटी !**

साकत येथील आमटी भाकरी महाप्रसादाची परंपरा पालखी स्थापनेपासून अद्यापही सुरूच असून त्यास ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद लाभत आहे. यासाठी गावातील प्रत्येक घरातील कुटुंबाकडून शंभर भाकरी करून देण्याची परंपरा आजही टिकून आहे. लोकवर्गणीतून यावर्षी दोन हजार लिटर आमटी बनिवण्यात आली.

## जाहीर प्रगटन

समस्त गावकरी राक्षसवाडी बु., ता. कर्जत, जि. अहिल्यानगर यांना कळविण्यात येते की या कार्यालयात श्री/श्रीम. कार्तिक हरीचंद्र रेवनाथ दिंडोरे, रा. राक्षसवाडी बु. ता. कर्जत जि. अहिल्यानगर यांनी मुलगा नामे श्री/श्रीम. कार्तिक हरीचंद्र रेवनाथ दिंडोरे या नावे जन्म/मृत्यू प्रमाणपत्र मिळणे बाबत मागणी केलेली आहे.

सदर व्यक्तीचा जन्म/मृत्यू राक्षसवाडी खु., ता. कर्जत, जि. अहिल्यानगर या ठिकाणी दि. ०२/०३/२०२२ रोजी झाला असुन प्रमाणपत्र मिळणेसंबंधीत दि.०६/०८/२०२५ रोजी या कार्यालयात अर्ज केला आहे.

वरील व्यक्तीच्या जन्माबाबत कोणाची हरकत असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिद्ध झालेपासुन १५ दिवसाच्या आत आपली लेखी हरकत या कार्यालयास सादर करावी. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती मान्य केल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**( रवि सतवन )**
**तहसिलदार कर्जत**

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
बुधवार दि.१५ जुलै २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## श्रीरामपूरात आज पेट्रोल पंप दोन तास बंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**माळवाडगाव :** श्रीरामपूर येथील युवा उद्योजक आकाश दुबैय्या यांच्या निर्घृण हत्येचा निषेध करण्यासाठी आज, बुधवार (दि.१५ ) जुलै रोजी श्रीरामपूर तालुक्यातील सर्व पेट्रोल पंप सकाळी १० ते १२ या वेळेत बंद राहतील. पेट्रोल पंप युनियनने तहसील प्रशासनाला या आंदोलनाचे निवेदन दिले आहे. नागरिकांनी गैरसोय टाळण्यासाठी आधीच इंधनाची व्यवस्था करून सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहेत.





# जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे बारामतीत स्वागत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** 'हीच व्हावी माझी आस, जन्मोजन्मी तुझा दास, पंढरीचा वारकरी, वारी चुको न दे हरी ' या भावनेसह, टाळ-मृदंगाच्या गजरात, 'ज्ञानोबा- माऊली तुकाराम'....रामकृष्ण हरी जय जय रामकृष्ण हरी... अशा जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे आज बारामती तालुक्यात आगमन झाले.

मौजे खराडेवाडी येथे प्रशासनाच्यावतीने उप विभागीय अधिकारी उत्तम दिघे यांनी पालखी रथ आणि दिंड्यांचे दर्शन घेऊन स्वागत केले. यावेळी पंचायत समितीचे सभापती किरण तावरे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांचे खाजगी सचिव सचिन यादव, बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील, उप विभागीय पोलीस अधिकारी चैतन्य कदम, दौंडचे बापूराव तडस, बारामतीचे तहसीलदार स्वप्नील रावडे, दौंडचे तहसीलदार अरुण शेलार, बारामतीचे गट विकास अधिकारी किशारे माने, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

जर्मन हँगर पद्धतीचे मंडप, पिण्याचे पाणी, वीज, फिरते वैद्यकीय पथके, मोफत औषधोपचार, चरणसेवा, हिरकणी कक्ष, निवारा केंद्र, आपत्ती व्यवस्थापन कक्ष, फिरते सुलभ शौचालय, कचरा वाहतूक घंटागाडी, कचरा कुंडी, पोलीस मदत केंद्र, अग्निशमन यंत्रणा, रुग्णवाहिका, सूचना फलक आदी व्यवस्था करण्यात आली असून ध्वनीक्षेपकाद्वारे सूचनाही देण्यात येत आहेत.

### प्रशासनातर्फे वारकऱ्यांसाठी सुविधा...

बारामती तालुक्यात जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचा मुक्काम उंडवडी गवळ्याची व बारामती शहरात शारदा प्रांगण या ठिकाणी आहे. आषाढी वारीकरीता येणाऱ्या वारकऱ्यांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तालुका प्रशासन, बारामती नगरपरिषद, पंचायत समिती, पोलीस विभाग, आरोग्य विभागाच्यावतीने तयारी केली आहे.

## विहिरीवरील मोटर सुरु करण्यावरून शेतकऱ्याला मारहाण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तालुक्यातील कानडगाव येथे सामाईक विहिरीवरील पाण्याची मोटर सुरू करण्याच्या वादातून एका शेतकऱ्याला शिवीगाळ व मारहाण झाल्याची घटना रविवारी (१३ जुलै) सकाळी घडली. या प्रकरणी राहुरी पोलिसांनी तिघांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, असिफ बक्षु सय्यद (वय ४६, रा. कानडगाव, ता. राहुरी) यांची गावच्या शिवारात शेती असून तेथे सामाईक विहीर आहे. त्यांच्या शेतात पत्र्याच्या शेड व कंपाउंडचे काम सुरू आहे. रविवारी सकाळी साडेआठच्या सुमारास ते सामाईक विहिरीवरील पाण्याची मोटर सुरू करण्यासाठी गेले असता आरोपींनी त्यांना अडवले. ही आमची विहीर असून मोटर सुरू करायची नाही, असे सांगत शिवीगाळ केली. असिफ सय्यद यांनी शेडचे कामही अडविल्याचा जाब विचारताच आरोपींनी लाकडी काठी तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. तसेच पुन्हा विहिरीवर आल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी असिफ सय्यद यांच्या फिर्यादीवरून रज्जाक बक्षु सय्यद, नादिरा रज्जाक सय्यद व अलीहुसेन रज्जाक सय्यद (सर्व रा. कानडगाव, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा क्रमांक ७८१/२०२६ दाखल करण्यात आला आहे. पोलिस निरीक्षक रविंद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

## बोटा परिसरात संध्याकाळी अंधार; बिबट्याच्या दहशतीत नागरिक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**घारगाव :** संगमनेर तालुक्यातील बोटा आणि परिसरातील उड्डाणपुलापासून वरच्या बाजूला असलेल्या मळ्यांमध्ये तसेच वस्त्यांवर गेल्या चार महिन्यांपासून महावितरणकडून दररोज संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत अघोषित वीज कपात केली जात आहे.

विशेष म्हणजे, मुख्य गावठाण भाग सुटल्यानंतर केवळ शेतातील वस्त्यांवरच हा अंधार केला जात असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. सध्या परिसरात समाधानकारक पाऊस झाल्यामुळे शेतातील मोटारी आणि पाण्याचे पंप पूर्णपणे बंद आहेत.

विजेचा वापर कमी असतानाही 'अतिरिक्त लोड'चे कारण पुढे करून वीज बंद ठेवणे हा महावितरणचा नियोजनशून्य कारभार उघड करतो. शेजारील जुन्नर आणि अकोले तालुक्यात अशी कोणतीही कपात नाही, मग हा नियम केवळ बोटा परिसरातील मळ्यांनाच का, असा जाब नागरिक विचारत आहेत.संध्याकाळी ६ ते ९ ही वेळ पहिली ते सातवीतील लहान मुलांच्या अभ्यासाची हक्काची वेळ असते.

नेमक्या याच वेळी वीज गायब होत असल्याने मुलांचा अभ्यास पूर्णपणे ठप्प झाला आहे. तसेच या भागात सध्या बिबट्याचा वावर आणि दहशत मोठ्या प्रमाणावर आहे.

अंधारामुळे महिलांना स्वयंपाक करताना कसरत करावी लागत असून, पाळीव प्राण्यांच्या व नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

### मोठ्या आंदोलनाचा इशारा

या तीव्र समस्येची दखल घेत बोटा गावाचे उपसरपंच संतोष शेळके यांनी महावितरणला कडक शब्दांत इशारा दिला आहे.

महावितरणने या अन्यायकारक वीज कपातीच्या वेळेत तातडीने सुधारणा करून मळ्यातील नागरिकांना दिलासा दिला नाही, तर बोटा आणि परिसरातील ग्रामस्थांना सोबत घेऊन महावितरणविरोधात मोठे जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

## उद्धव ठाकरेंच्या तोंडून रामरक्षेची भाषा शोभत नाही

### त्यांच्याच काळात औरंगजेब कबरीचे उदात्तीकरण : ना. राधाकृष्ण विखे

यावर चर्चा करण्यापेक्षा आता जे चांगलं काम सुरू आहे. त्याला जनतेनं साथ दिली पाहिजे. ज्या-ज्या ठिकाणी दुधात किंवा इतर अन्नपदार्थांमध्ये भेसळ होत असेल, त्याची माहिती नागरिकांनी थेट प्रशासनाला देणे गरजेचे असून जेणेकरून पूर्णपणे भेसळमुक्त महाराष्ट्र करता येईल .

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्री असताना त्यांच्याच काळात औरंगजेबाच्या कबरीवर फुलं उधळली गेली होती, त्यामुळे त्यांच्या तोंडी रामरक्षेची भाषा शोभत नसल्याचा टोला राज्याचे जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे यांनी लगावला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी शिर्डीत साईबाबांच्या समाधीचं दर्शन घेतलं.

दर्शनानंतर ते म्हणाले की, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं नागपूर याठिकाणी रामरक्षा आंदोलन होत आहे. त्यांच्या तोंडून आता रामरक्षासारखी भाषा शोभून दिसत नाही. उद्धव ठाकरे स्वतः मुख्यमंत्री असताना त्यांच्या कार्यकाळात संभाजीनगरमध्ये औरंगजेबाच्या कबरीवर फुलांची उधळण झाली. औरंगजेबाचे उदात्तीकरण करण्याचं काम त्यांच्याच काळात झालं. त्यामुळं आता अशा लोकांच्या तोंडून रामरक्षेसारखी भाषा अजिबात शोभून दिसत नाही, असा टोला विखे पाटील यांनी उद्धव ठाकरे यांना लगावला. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महायुती सरकारचा कारभार अत्यंत सक्षमपणे सुरू आहे. संपूर्ण देशाचा विचार केला, तर सर्व आघाड्यांवर आणि विविध निकषांवर आपलं राज्य पहिल्या क्रमांकावर पोहोचलं आहे.

त्यामुळं महाराष्ट्राचं नेतृत्व बदलण्याच्या ज्या वावड्या उठवल्या जात आहेत. त्यात काहीही तथ्य नाही.राज्याचं नेतृत्व आज देवेंद्र फडणवीस यांच्या हातात सुरक्षित असून तेच पुढंही नेतृत्व करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### त्यांचे पापाचे घडे भरले

राज्यात दुधातील भेसळीच्या रॅकेटवर झालेल्या कारवाईबद्दल त्यांनी अन्न व औषध प्रशासनाचे अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या कामाचे कौतूक करत ना. विखे म्हणाले की, तुकाराम मुंढे यांचे काम अतिशय उत्तम सुरू असून जनतेनंही त्यांच्या या मोहिमेचं स्वागत केलं आहे.

दुधाच्या बाजारातील भेसळीचं मोठं रॅकेट उद्ध्वस्त करण्याचा निर्णय अतिशय स्तुत्य आहे. लहान मुलांच्या आरोग्याशी खेळून दुधाच्या माध्यमातून विष कालवण्याचं पाप काही लोक करत होते. अशा लोकांच्या पापाचे घडे आता भरले आहेत. मागं काय घडलं?

## शिक्षण उपसंचालक कार्यालयाचा गलथान कारभार

### पेन्शनर व शिक्षकांच्या वेतनास दरमहा होतो उशीर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयातील लेखाधिकारी व कर्मचारी यांच्या दिरंगाईच्या कामामुळे नगर पुणे सोलापूर या तिन्ही जिल्ह्यांच्या नगर पालिका शिक्षण मंडळातील सेवानिवृत्त शिक्षक यांची पेन्शन व कार्यरत शिक्षकांचे वेतन दरमहा उशिरा होत असल्याने पेन्शनरांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

राज्यात शिक्षकांच्या वेतनासाठी शालार्थ वेतन प्रणाली लागू झाली असली तरी नगरपालिका शिक्षण मंडळाच्या शिक्षकांना ती अद्याप लागू नाही या शिक्षकांचे वेतन पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयामार्फत केले जाते त्यासाठी दरमहा वेतन व पेन्शन बिले पुण्याला पाठवावे लागतात विभागातील जवळपास २२ ते २४ शिक्षण मंडळातील शिक्षकांचे वेतन व सेवानिवृत्तांची पेन्शन पुणे विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय मार्फत होते दरमहा पगारविले उशिरा मागवली जातात .ती तपासून बिले अंतिम करून ट्रेझरीला पाठवली जातात ट्रेझरीमध्ये आठ-आठ दिवस ती पास होत नाही.

या टेबलला माणूस नसल्याने ही दिरंगाई दरमहा होते असे उत्तर दिले जाते याबाबत सेवानिवृत्त संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश माने यांनी वेळोवेळी शिक्षण उपसंचालक तसेच संघटनेकडे पत्रव्यवहार केला आहे परंतु शिक्षण उपसंचालक कार्यालयातील कर्मचारी याबाबत कोणतीही दाद देत नाही. उपसंचालक कार्यालयामध्ये वेतन व पेन्शन कामाची जबाबदारी स्वीकारण्यास कुणीच माणूस तयार होत नाही का ? हे काम कर्मचाऱ्याकडे सोपवण्याची जबाबदारी कोणाची आहे असं संतप्त प्रश्न पेन्शनर यांनी उपस्थित केला आहे.

याबाबत अनेक लोकप्रतिनिधींनी शिक्षण उपसंचालक कार्यालयाला वेळोवेळी सूचना केल्या आहेत मात्र अधिकारी बदलले की कामाची पद्धत बदलते आणि पुन्हा मागील प्रमाणे दिरंगाई सुरू असते. पेन्शन उशिरा होत असल्याने पेन्शनर लोकांना अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते. यामध्ये कुटुंब निवृत्तीवेतन घेणाऱ्या महिलांची संख्या जास्त असल्याने व उतार वयात त्यांना मनस्ताप सहन करावा लागतो. तरी दरमहा पाच तारखेच्या आत नगरपालिका शिक्षण मंडळातील शिक्षकांचे वेतन व सेवानिवृत्तांची पेन्शन जमा होईल याबाबतचे नियोजन शिक्षण उपसंचालक कार्यालयाने करावे यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करावा अशी मागणी पेन्शनर संघटनेने केली आहे.

**''दर महिन्याला पेन्शन उशिरा होत असल्याने कुटुंब निवृत्ती वेतन घेणाऱ्या महिलांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. स्वतःचे आजारपण आणि इतर कौटुंबिक गरजा यांचा विचार करता दरमहा पाच तारखेच्या आठ पेन्शन होणे आवश्यक आहे.''**

**प्रकाश माने, अध्यक्ष, पेन्शनर संघटना**

# संघटित गुन्हेगारीविरोधात श्रीरामपूर एकवटले

## आज सर्वपक्षीय मोर्चातून सरकारला धडक इशारा




तिसऱ्यादिवशी हत्येच्या निषेधार्थ श्रीरामपूर कडकडीत बंद, व बेलापूरात बंदामुळे व्यवहार ठप्प झाले होते. **(छायाचित्र : अमोल कदम, सुनिल पांढरे)**

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** हॉटेल व्यावसायिक आकाश शेखर दुबैय्या यांच्या निर्घृण हत्येनंतर श्रीरामपूरमध्ये संघटित गुन्हेगारीविरोधात अभूतपूर्व जनआक्रोश उसळला आहे. या घटनेच्या निषेधार्थ शहरात सलग चार दिवस कडकडीत बंद पाळण्यात आला असून आज (बुधवारी) सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चामध्ये सर्व धर्मीय, सर्वपक्षीय नागरिक, व्यापारी आणि विविध सामाजिक संघटना मोठ्या संख्येने सहभागी होणार असून कायदा व सुव्यवस्था मजबूत करण्याची मागणी सरकारकडे करण्यात येणार आहे.

गेल्या काही वर्षांत शहरात वाढती गुन्हेगारी, अमली पदार्थांची विक्री, खंडणीखोरी आणि व्यसनाधीनतेच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली होती. आकाश दुबय्या यांच्या हत्येनंतर ही नाराजी उफाळून आली असून राजकीय मतभेद बाजूला ठेवत सर्व पक्ष एकत्र आले आहेत. आमदार हेमंत ओगले आणि नगराध्यक्ष करण ससाणे, प्रकाश चित्ते यांच्या आवाहनाला विविध पक्षांच्या नेत्यांनी प्रतिसाद देत आंदोलनात सहभाग नोंदविला आहे. नागरिकांच्या मते, श्रीरामपूरची शांतताप्रिय आणि सामाजिक सलोख्याची परंपरा कायम राखण्यासाठी गुन्हेगारीवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी शहरातील कायदा व सुव्यवस्था सुधारण्यासाठी महिनाभरात उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले असले, तरी त्यांनी आंदोलकांशी प्रत्यक्ष संवाद साधून विश्वास द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

आजच्या सर्वपक्षीय मोर्चाकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, या आंदोलनानंतर शासन आणि पोलीस प्रशासन कोणती ठोस पावले उचलते, यावर श्रीरामपूरच्या भविष्यातील कायदा व सुव्यवस्थेची दिशा अवलंबून राहणार असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.

### बेलापूर बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद

श्रीरामपूर येथील हॉटेल व्यावसायिक अशोक दुबैय्या यांच्या हत्येप्रकरणी आरोपीना शासन व्हावे, बेलापूर गावाची शांतता कायम रहावी, या मागणीसाठी पुकारलेल्या दोन्ही गावात या बंदला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.गेल्या पंधरा दिवसापासून शहरातील वातावरण गुन्हेगारी पार्श्वभुमीमुळे खराब झाले आहेत. वाढत्या गुन्हेगारीचा फाटा व्यापारी व नागरिकांना बसत आहे. हत्येमुळे व्यापारी व नागरिका मध्ये उद्रेक झाला आहेत. त्यामुळे बंदला पाठिंबा देण्यासाठी बेलापूरगाव पूर्णपणे बंद ठेवण्यात आले होते.

# तरुणीच्या फोटोचा गैरवापर

## सोशल मीडिया खाती तयार करून बदनामीचा प्रयत्न

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** सोशल मीडियाचा वाढता वापर होत असताना सायबर गुन्ह्यांचे प्रकारही वाढत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात एका १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणीच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तरुणीच्या नावाने बनावट सोशल मीडिया खाती तयार करून तिचे फोटो परवानगीशिवाय प्रसारित केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ जून रोजी दुपारी सुमारे सव्वाबारा वाजण्याच्या सुमारास अज्ञात सायबर गुन्हेगाराने संबंधित तरुणीचे फोटो मिळवून तिच्या नावाने तीन बनावट सोशल मीडिया प्रोफाइल तयार केले. या बनावट खात्यांवरून तिच्या संमतीशिवाय वैयक्तिक छायाचित्रे इंटरनेटवर प्रसारित करण्यात आली. यामुळे तरुणीची बदनामी होण्याबरोबरच तिच्या गोपनीयतेचा भंग झाला. हा प्रकार निदर्शनास येताच संबंधित तरुणीने तातडीने अहिल्यानगर सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध माहिती तंत्रज्ञान कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. बनावट खाती तयार करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यासाठी तांत्रिक तपास सुरू असून, सायबर पोलीस विविध डिजिटल पुराव्यांची पडताळणी करत आहेत.

दरम्यान, सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती, छायाचित्रे आणि अन्य माहिती शेअर करताना नागरिकांनी सतर्क राहावे, अनोळखी व्यक्तींच्या फ्रेंड रिक्वेस्ट किंवा संदेशांना प्रतिसाद देताना काळजी घ्यावी तसेच कोणताही संशयास्पद प्रकार आढळल्यास तात्काळ सायबर पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.